# डॉ. नितीन मोरे



# अहम ब्रह्मास्मि !

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# अहम ब्रह्मास्मि !

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २७ फ़ेब्रुवारी २०१७

(मराठी भाषा दिन)

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई नचीसाहित्य प्रतिष्ठा-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या संग्रहातील सर्व लेख हे काल्पनिक असून त्यांतील व्यक्ती, स्थळे, प्रसंग यांचे कोणाला स्वतःशी साम्य दिसून आल्यास त्यांनी ते कोणाला सांगू नये.

उगाच स्वतःचे हसे करून घ्याल.

हे हे हे !!!

## प्रस्तावना

अहं ब्रह्मास्मि !

मी !

जगातील हा सर्वात जास्त बोलला जाणारा शब्द असेल ही कदाचित.

मी आहे म्हणून तुम्हाला सांगतोय...

दुसरा कोणी ऐकूनही घेईल काय तुमचे?...

मी आहे म्हणून !...

मी, मला, माझे !

काही प्रमाणात आपण. अगदीच फार झाले तर थोडे फार आपल्याला नि आपले !

'ते' जरा दूरवरच ! त्यांच्याशी तसा संबंध 'मी' म्हणूनच येणार.

म्हणजे 'त्यां'च्या गोष्टीतही मी येणे अटळ !

एकूण काय 'मी' म्हणजे माझे जग !

'मी' ब्रह्मच आहे म्हणानात !

मोठे मोठे संत महात्मे सांगून गेले की 'मी' पण सोडा. एखाद्या पक्व फळापरी 'मी' पण गळले तो संत झाला.

पण अगदी मी मी म्हणणा-यांचा ‘मी‘ पणा कच्च्या फळासारखा तुटता न तुटणारा , चिकटून घट्ट बसलेला दिसतो !

अर्थात एवढेही काही गंभीर व्हायची गरज नाही.

मला वाटते या ‘मी‘ कडे नुसत्याच विनोदाने बघायला काय हरकत आहे !

तर या ‘मी‘ च्या संग्रहात गंभीर तसे काही नाही.

काही या ‘मी‘ च्या स्वभाव वैशिष्ट्यांकडे एक नजर टाकायचा प्रयत्न तर काही नुसताच गंमतीचा भाग आहे.

डॉ.नितीन मोरे

अर्पणपत्रिका

अहं म्हणजे मी ला मी आहे तसा मी बनवणा-या माझ्या आई अण्णांना सादर अर्पण

अनुक्रमणिका


१. अहं ब्रह्मास्मि !

२. मी : सदाचाराचा पुतळा

३. आम्ही : एक विनोदी विद्वान

४. आमच्या विनोदाचे मार्केटिंग

५. पं.वा.पोळ : एक द्रष्टा पुरूष

६. मी (गद्य) लेखक कसा झालो

७. व्यथा एका कथा लेखकाची

८. मी आणि माझे भविष्य

९. ही : एक करवादिनी

१०. मी घेतलेली माझी मुलाखत

११, मी एक भाषासेविका

१२. काही कौटुंबिक क्षणचित्रे

१३. स्वप्नांच्या अलि-पलिकडले

१४. (माझ्या) भविष्यावर बोलू काही..

१

## अहं ब्रह्मास्मि !

‘अहं ब्रह्मास्मि‘

‘असशील‘

‘असशील नाही, आहेच !‘

‘असेल. कुणाच्या बापाचे काय जाते?‘

‘अरे, असेल नाही, आहेच अहं ब्रह्मास्मि‘

‘एवढा अहं बरा नाही‘

‘हा मराठीतला नाही, संस्कृतातला अहं‘

‘असेल‘

‘असेल नाही, आहेच. अहं ब्रह्मास्मि‘

‘तुला सांगतो, you are infested with G'

'Infested with G? ही काय भानगड जी?‘

‘तुला ग ची बाधा झालीय‘

‘ऑह ! ग ची बाधा बिधा काय नाय रे, मी खरंच सांगतोय, अहं ब्रह्मास्मि‘

‘असूदेत, उद्या तू स्वत:ला देवाचा अवतार समजशील‘

‘समजशील? समजायला कशाला हवे? आहेच मी‘

‘देवाचा अवतार?‘

‘yes, descendent of देवास !‘

‘देव की देवास?‘

‘अरे देवांच्या घराण्यातला‘

‘घराणे? तेही देवाला? मला वाटते ईश्वर एकच आहे. सारे देव ही मानवाचीच निर्मिती म्हणतात‘

‘ईश्वर? मी देवाबद्दल बोलतोय‘

‘Come on, ईश्वर आणि देव काय वेगवेगळे असतात?‘

'Of course ! ईश्वरमामा माझ्या मातुल घराण्यातला‘

‘तुझे डोकंबिकं फिरलंय काय रे? ईश्वर मामा काय?‘

‘नाही. मी परत सांगतोय, अहं ब्रह्मास्मि!‘

‘ठीक आहे. ब्रह्मास्मि तर तसे. तू ब्रह्मास्मि बस्स?‘

‘ब्रह्मास्मि नाही, ब्रह्म‘

‘अरे आताच तर तू बोललास, अहं ब्रह्मास्मि म्हणून‘

‘ते खरंय‘

‘मग मी काय चुकीचे बोललो?‘

‘अहं ब्रह्मास्मि म्हणजे माझे नाव ब्रह्मा आहे!‘

‘साष्टांग दंडवत देवा !‘

‘आशीर्वाद असोत‘

‘तू स्वत:ला काय देवबिव समजतोस की काय?‘

‘समजतो? आहेच मी‘

‘देव आहेस? कपिलदेवचा भाऊच जसा‘

‘Yes. No. म्हणजे माझे नावच ब्रह्मा विष्णू देव आहे. I am Mr B.V.Dev!'

'Oh ! म्हणजे त्वम ब्रह्मा नस्तिं!‘

‘नकोस संस्कृतचे लचके तोडूस रे, अरे माझे बाबा विष्णू देव, त्यांचा मी शेंडेफळ !‘

‘कळले ! तू ब्रह्मा आहेस कळले‘

‘आहेच खरे ! अहं ब्रह्मास्मि!‘

२

## मी : एक सदाचाराचा पुतळा

आजचीच गोष्ट. आज सकाळी आरशासमोर उभा राहिलो आणि मलाच माझा कॉम्प्लेक्स आला. ईश्वराने का मलाच एवढे रुबाबदार आणि सुंदर बनवावे? नेहमी मला वाटायचे की त्यामुळे माझ्या बरोबरीच्या लोकांनाही तसेच वाटत असेल. माझ्या सहा फुटी उंचीने मी सर्वांत उठून तर दिसतोच. त्यात मोजून पन्नास किलो वजन. त्यामुळे माझ्या सडपातळत्वाचा कित्येकांना हेवा वाटतो. विशेषत: माझ्या ऑफिसातील पांचाळला तर नक्कीच. स्वत: मारे मैद्याच्या पोत्यासारखा आहे पण मला म्हणतो की माझ्यावर कपडे म्हणजे गुढी पाडव्याला गुढीवर कापड गुंडाळल्या सारखे दिसतात आणि माझी देहयष्टी म्हणजे यष्टी सारखा देह आहे म्हणे. का त्याला एवढा माझा हेवा वाटावा? अर्थात देवाला इतरांची ही चिंता असावी त्यामुळे त्याने गालबोट म्हणून थोड्याफार गोष्टी ठेवल्यात. म्हणजे माझे दोन पिवळे दात जरा जास्तीच बाहेर आलेत कुऱ्हाडी सारखे आणि बाकी दातांची ठेवण पण जराशी वाकडीतिकडी आहे, किंवा माझ्या पाठीला जरासे पोक आहे आणि मला जरासे लंगडत चालायची सवय आहे. बोलताना जरासा बोबडा उच्चार होतो असे पांचाळ म्हणतो. पण हे सर्व माझ्या रुबाबदार पणाला नजर लागू नये म्हणूनच असणार.

म्हणजे आता हे असे सांगायचे कारण मी सत्यवचनी आहे. उगाच खोटे बोलायला किंवा खोट्या विनयाने बोलायला मला आवडत नाही. आमच्या शाळेत दुर्गा खोटे नावाच्या शिक्षिका होत्या. नाव दुर्गा खोटे पण त्या प्रत्यक्षात पडद्यावरच्या ललिता पवारांसारख्या वागायच्या. त्यांनी सदैव खरे बोलावे असे दरडावून अशाप्रकारे सांगितले की वर्गातील ९० टक्के मुले तेव्हाच खोटे बोलायला शिकली. पण माझा स्वभाव म्हणजे सत्यलोलुप. ( हा माझा शब्द, my मराठीला अल्पशी देणगी ) त्यामुळे सत्याची कास मी कधी सोडली नाही. प्रत्यक्ष धर्मराजाला जिथे नरो वा कुंजरोवा म्हणून राजकीय धोरण पाळावे लागले तिथे मज पामराला मधून मधून तसे करावे लागते यात आश्चर्य ते काय? खास करून ऑफिसात उशीर झाला तर. आजवर मला ४-५ सख्ख्या आणि सावत्र आज्या, आजोबे आणि काके मामे आहेत हेच कधी मला माहित नव्हते. दर उशीराच्या वेळी ते मदतीला धावून येत माझी सुटका करीत आलेले आहेत. शेवटी अडचणीला जवळचे नातेवाईकच कामाला येतात ना? साहेबांना ही आता सवय झाली आहे. म्हणजे आधी जरा उशीर झाला की, ’काय आज कोणाचा नंबर?’ म्हणून विचारायचे. अर्थात आजकाल मात्र मी वेळेवर गेलो तरच उलट मला विचारतात, ’काय आज कसे वेळेवर?’साहेबांना याचा त्रास होतो म्हणून मी तशी पाळी जास्त येऊ नये म्हणून प्रयत्नात असतोच. हा कनवाळूपणाही माझ्या नसानसात आहे. आता ही सरकारी नोकरी आहे. त्यामुळॆ साहेब ही नोकर आणि मी पण नोकरच. थोडासा सिनीयॉरिटीचा फरक आणि काय. असो. पण या सर्व प्रकाराने माझ्या कल्पनाशक्तीत वाढ झाली आहे. तशी वेळ पाळण्याची मला सवयच. वक्तशीरपणा माझ्या रक्तातच भिनलेला. त्यामुळे अर्ध्या तासाहून उशीरा ऑफिसला आलो तर मला वाईट ते वाटतेच, त्या पांचाळ नावाच्या चांडाळासारखे नाही की नेहमी वेळेवरच यायचे आणि उशीरा येणाऱ्यांना उगीच हिणवायचे. मला मुळात इतरांना हीन लेखणेच पटत नाही. माझ्या नंतरही काही जण येतात पण त्या लोकांना त्याचे काहीही वाटत नाही, साळसूदा सारखे येऊन लगेच

कामाला लागतात. मला मात्र एवढे वाईट वाटते की ते सहन व्हावे म्हणून मला चहा प्यायला लगेच ऑफिसच्या कँटीनला जावेच लागते. मी काही बाकीच्यांसारखी लाज थोडीच सोडलीय?ऑफिसच्या कामात पण मी अत्यंत पर्टीक्युलर. खरे तर हिशेब ठेवायचे काम माझे नाही तरी पण ते मी इमानेइतबारे करत असतो. त्यात कोणाकडून काही घ्यायचे म्हणजे परफेक्ट हिशेब हवाच, शेवटी सरकारी ऑफिस आहे हे ना. पण देण्याघेण्यात पण मी कधी १० टक्क्यांहून जास्त ताणत नाही. प्रामाणिकपणा म्हणून काही चीज असते की नाही? माझ्या साहेबांशीही मी याबाबतीत कधी गद्दारी करत नाही, ज्याचे त्याचे ज्याला त्याला वेळेवर देऊन मोकळे व्हावे, शेवटी हे सर्व घबाड काय छातीवर बांधून थोडीच जायचे आहे? इन्कम टॅक्स तर नेहमी सरकार घेतेच पण मी मलाच एक वरकड टॅक्स लागू केला आहे तो म्हणजे वरकड उत्पन्नाच्या एक टक्का. ते पैसे जाता येता भिकार्यांत वाटून टाकायचे. असे मी लाखो रूपये अजून पर्यंत दान केले असतील. तेवढीच जनसेवा आणि पुण्यसंकलन. पण या सर्व दानाची वाच्यता मात्र मी कुठे करीत नाही, दानच ते, या हाताचे त्या हातास कळू नये म्हणतात. माझ्या कामाचा उरक पण चांगलाच आहे, त्यामुळे सदा माझ्याकडे फायलींचा ढिगारा पडला असतो. संध्याकाळी सर्व गेल्यावर मी फायलींत डोके खुपसून बसलेला असतो, ते सर्व ओव्हरटाईम साठी असे बाकीचे म्हणतात, पण माझी कामाची तळमळ मलाच ठाऊक, इतरांना फक्त ओव्हरटाईम दिसतो. जाताना त्यांची टेबलं रिकामी असतात आणि मी कामात गढलेला असतो. पण दुसर्यांच्या कामात ढवळाढवळ मला पटत नाही. आपण बरे आणि आपले काम बरे. कोणी त्याला अप्पलपोटेपणा म्हणाले तरी बेहत्तर.

घरी पण मी असाच. बायको कामात मग्न असली तर तिला उगाच त्रास नको म्हणून आरामात उठतो, माझ्या कामातल्या मदतीने तिचे काम अजून वाढेल याची

जाणीव ठेऊन कामे करायचेच टाळतो. इतरांच्या श्रमांची जाणीव ठेवायलाच हवी हे मी मुलांना यातून शिकवतो. शेवटी मुलांपुढे आदर्श आपणच ठेवायला हवा ना? आळस माणसाचा शत्रू असला तरी शत्रूवर प्रेम करण्याचे बाळकडू मला मिळाले आहे त्यामुळे उगाच त्या आळसाचा दु:स्वास मला पटत नाही. शेवटी आळस हा परिश्रमा आधीची विश्रांती असते, ती विश्रांती बायकोने घेतली काय की मी घेतली काय? आम्ही दोघे वेगळे थोडीच आहोत? तशी थोडीफार हालचाल मी करतो, म्हणजे आपला टीव्हीचा रिमोट उचल, त्याची बटणे दाब, कुठे वजन कमी करायला मैदानी खेळ व्हिडीओ वर खेळ असे उद्योग करत असतो, त्यात थकलो तर श्रमपरिहार परत. बायको माझ्यावर इतकी का चिडत असते तेच कळत नाही, हातपाय हलवा म्हणते. रिमोटची बटणे काय हात हलवल्या शिवाय दाबली जातील काय? हिला मात्र ते पटतनाही. चिडल्याने बीपी वाढेल असे काळजीने सांगितले तरी तिला पटत नाही. सवयच तिची, काय करणार?

क्षमाशीलता हा माझा मोठाच गुण आहे. माझ्या कितीही चुका झाल्या तरी मी डगमगत नाही कधीच. त्या परत परत झाल्या तरी बेहत्तर पण मी स्वत:ला नेहमीच मोठ्या मनाने क्षमा करत आलो आहे. माझ्या मुलांबाबतीत ही मी हेच करतो. मुलं आपली छोटी मोठी भांडणं घेऊन येतात. मी घरी असलो आणि जागा असलो तर माझ्या कडॆ येतात. मी टीव्हीला गप्प करतो आणि त्यांच्याकडे कान देतो. दुसऱ्यांच्या मुलांनी बिघडू नये म्हणून मी त्यांच्या चुका त्यांच्या शर्टाच्या खिशात घालतो आणि माझ्या मुलांना मोठ्या मनाने माफ करतो, मुलंच ती थोडीफार चुकायचीच,आणि मुलं शेवटी बापावर जाणारच ना?

तसा मी कधीही डगमगत नाही,परिस्थिती कशीही असली तरीही. माझ्या चेहर्‍यावरचे भाव किंवा भावाचा अभाव यामुळे आई मला बावळटासारखा बघू नकोस म्हणायची तर शाळेत शिक्षक म्हणायचे याच्या तोंडावरून माशी देखील हलत नाही. तेव्हा माहित नव्हते की याला स्थितप्रज्ञता म्हणतात म्हणून. माझ्या या स्थितप्रज्ञतेचे पाय अगदी पाळण्यातूनच दिसत आले आहेत. आता लोक त्याला मख्खपणा समजतात यात माझा काय दोष?

अजून कितीतरी सांगण्यासारख्या गोष्टी आहेत, पण मलाच आपली टिमकी वाजवत फुशारकी मारायची सवय नाही, हायर मराठीत त्यालाआत्मप्रौढी म्हणतात. हे इतके पण सांगितले कारण मला खोटे बोलता येत नाही आणि खोटा विनय पटत नाही म्हणून. त्यामुळे इथेच थांबतो आणि थोडी विश्रांती घेतो. हुश्श..

३

## आम्ही : एक विनोदी विद्वान

आमचे असे मत आहे की विनोद ही एक सर्व जीवनव्यापी गंभीर बाब आहे. गेल्या काही शतकांचा धांडोळा घेऊ गेल्यास हे प्रकर्षाने जाणवेल की व्यक्तिगत पातळीवर प्रश्न असो की सामाजिक स्तरावरील लढा, विनोदाने त्यात नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जागतिक स्तरावर शेक्सपियर असो की बर्टांड रस्सेल. त्यांनी विनोदास फाटा दिला असेल. काही साहित्य तर हसवण्याच्या झऱ्याऐवजी दु:खाचे प्रपात कोसळावे असे प्रसवले असेल. तरीसुद्धा फ्रेंच राज्यक्रांतीनंतर आणि रेनिसँ नंतरच्या काळाचे विश्लेषण करू गेल्यास विनोदाचे आयुष्याप्रती आणि समाजाप्रती असलेले दायित्व अधिकच ठळकपणे जाणवेल. वूडहाऊस पासून वर्डस्वर्थ पर्यंत ते थेट आफ्रिकेतील नक्रूमा असो की युरोपियन सार्त्र की आल्बेर कामू. वा टॉलस्टॉयसारखा रशियन लेखक असो. किती नावे घ्यावीत? ब्राऊनिंग आणि यीट्स यांच्या विनोदाने एक काळ गाजविला. काफ्का आणि कामू नंतर विनोदाचा अस्त्र म्हणून वापर होऊ लागला. वूडहाऊस विनोदासाठी विनोद करीत असे तर बाकी काही विनोदास शस्त्र म्हणून वापरीत असत असे दिसून येते. आपल्याकडील कलेसाठी कला की जीवनासाठी कला हा त्याच वादाचा पुढचा भाग असावा याबद्दल आमच्या मनात किंचितही किंतु नाही. या सर्वांच्या विनोदाने जगास एक वेगळे वळण लावलेले आहे. आपल्याकडील म्हणजे एत्तदेशीय किंवा नेमकेच सांगायचे तर महाराष्ट्रदेशीय उदाहरणे

सोडून देऊ. कारण आपल्याला या सर्व विषयाचा जागतिक पातळीवर सांगोपांग विचार करायचा आहे. या सर्वांचा मागोवा हेच दाखवतो की विनोदाचे अविष्कार आणि आयाम यांनी सामाजिक पातळीवर आणि राजकीय आणि गैरराजकीय पातळीवर प्रभाव पाडला आहे. एक काळ असा होता की तेव्हा विनोदी लेखकास विदूषक म्हणून हिणवले जाई. आजही ही प्रवृत्ती दिसत नाही असे नाही. पण वैश्विक पातळीवर विचार केल्यास विनोदातून होणारी निष्पत्ती ही एकूणच कितीतरी अधिक आहे. कोण्या विनोदी लेखकास पंक्तीत आपले पान आडवे मांडले जाईल याची धास्ती वाटलीही असेल तर ते साहजिकच आहे. पण म्हणून विनोदाची स्थानिक आणि जागतिक पातळीवरची उपलब्धी विसरून चालणार नाही. थोडक्यात विनोद ही गंभीरपणे घेण्याची गोष्ट आहे. विदूषकास मान मिळो की न मिळो, बावन्न पत्त्यांतही दोन जोकर हात मिळवून देतात. विनोद हा त्यामुळेच हुकुमाचा एक्का होऊ शकतो. आम्ही खुद्द त्यामुळेच आयुष्यभर विनोदाच्या वाटेवर वाटचाल केलेली आहे. विनोदी वाड;मयात आम्हास कोणी हसण्यावारी नेत असेल तरी त्यात त्यांचेच नुकसान आहे हे आम्हीच जाणून आहोत. हसण्यासाठी जन्म आपुला हे आमचे तत्वज्ञान. अर्थात आम्ही 'I Me Mine' अशा संप्रदायतील नाही आहोत त्यामुळे आपली टिमकी आम्ही इथे वाजवू इच्छित नाही. फक्त जागतिक स्तरापासून अगदी स्थानिक पातळीवर विनोद कसा पसरला आहे एवढेच दाखवून द्यावे हा आमचा हेतू. विनोद आणि आम्ही म्हणूनच अविभाज्य आहोत. आयुष्यात नॉन-विनोदी लिहीले असेल आम्ही तर ते हे एवढेच ! असो.

हे सर्व वाचून सामान्य वाचकास आम्ही विद्वान आहोत याची खात्री पटली असेलच. शेवटी हेच तर महत्त्वाचे. आमच्यात खरोखरची विद्वता असेलही पण तीस बहुमताचा आधार मिळत नाही तोवर ती व्यर्थ आहे. बहुजनांस आम्ही विद्वान वाटणे गरजेचे आहे. कारण आम्ही अंतर्बाह्य लोकशाहीवादी आहोत.

वरील मजकूरात काही तपशीलाच्या चुका आढळतील. काही कशाला, बहुतेक सर्वच तपशील चुकीचा असेल, नव्हे आहेच. याची आम्हाला खात्री आहे. या तपशीलातील गफलती काय काय असाव्यात याचा मात्र आम्हाला अंदाज नाही. कारण यातील काही नावे वगळता बाकीचा तपशील आम्ही आमच्या कल्पनाशक्तीच्या जोरावर भरून काढला आहे. यावर विद्वज्जनांना आक्षेप असू शकतो हे खरे. पण आम्ही अंतर्बाह्य लोकशाहीवादी. समजा निवडणुकीचे दिवस आहेत, महनीय नेते इतिहासातील दाखले बिनधास्त चुकीचे देत फिरत असतात ते ही अगदी नाव आणि तारखांनिशी. काय बिघडते त्याने? बहुजनांना इतिहास हा असाच ठाऊक असतो. मूठभर इतिहासाचार्यांना नि अभिजनांना ही भले इतिहासाची तोडफोड वाटो, बहुजनांना पटतो तोच खरा इतिहास. या न्यायाने आमचा सुरूवातीच्या परिच्छेदातील मजकूर सर्वमान्य होण्यास हरकत नसावी. महनीय नेते या ऐतिहासिक तोडफोडीनंतर मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान होण्याची नि नवा इतिहास घडवण्याची स्वप्ने पाहू शकतात तर आम्ही नुसती विद्वान म्हणवून घेण्याची मनीषा बाळगली तर त्यात काय गैर असावे? विद्वज्जनांचा दुसरा आक्षेप असा असू शकतो की पहिल्या परिच्छेदातून हाती काहीच लागत नाही. आम्ही म्हणतो, नसेलही लागत. आम्हीच ही 'शब्द बापुडे केवळ वारा' अशी स्टाईल विकसित केली आहे. त्यातूनच आम्ही विद्वान आहोत याबद्दल आमच्या स्वत:च्या मनात तरी शंका नाही. थोडक्यात अभिजनांस काहीही वाटो आम्ही जनतेचे विद्वान आहोत हे खरे !

४

## आमच्या विनोदाचे मार्केटिंग

नमस्कार ! आम्ही विनोद गायतोंडे. इतक्या वर्षांनंतरच्या साहित्य सेवेनंतरही आम्हाला आमची ओळख करून द्यावी लागते हेच तर दुर्दैव आमचे आणि मराठी सारस्वताचे देखील. तशी आमची ओळख म्हणजे आम्ही लूटमार या मोठ्या मॉल मध्ये सेल्स प्रमोशन ऑफिसर आहोत, अर्थात त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आम्ही आमच्या नावाला जागत विनोदाचे पाईक आहोत. आमची भूक भागवायास ही नोकरी उपयोगी पडत असली तरी आमची मानसिक आणि साहित्यिक भूक मात्र आमच्या विनोदी लेखनातूनच भागते. आमच्या मॉलमधील वेगवेगळे व्यावसायिक आमच्या कडून व्यवसाय वृद्धीसाठी सल्ला घेत असतात. तेथे आम्हाला आमची प्रतिभा उपयोगी पडते. आमच्या विनोदाच्या व्यासंगाचा आम्हाला यात खूपच फायदा असतो. आम्ही वेगवेगळया स्कीम्स बनवतो त्या पाहून जनसमुदायाच्या चेहर्‍यावर हसू फुटलेले आम्ही पाहिले आहे. आम्ही आगपेटी बनवणार्‍यांस पण असा सल्ला दिला होता, की ग्राहकाने विकत घेण्या आधी प्रत्येक काडी पेटवून पहावी आणि मग ती काडेपेटी घरी न्यावी.अशी योजना सुरू करा. ग्राहकांचा संतोष हेच आपले समाधान! वेगवेगळया स्कीम्स बनवायचा आमचा हातखंडा. मार्केटिंग म्हणजे एक प्रकारचा विनोद आहे त्यामुळे आम्हास ते नीट जमते. त्यासाठी वेगवेगळया शब्दांत योजना बनवणे ही आमची साहित्यिक जोड सेवा म्हणता येईल. साहित्याच्या क्षेत्रात आम्ही उपेक्षित असलो तरी मार्केटिंग मध्ये आम्ही नामवंत आहोत, त्यात आमचा जीव रमत नसला तरीही.

उदाहरण द्यायचे तर कसले कसले द्यावे? आमच्या मॉल मध्ये वेगवेगळे व्यावसायिक आहेत. 'राईझ अॅंड फॉल बिल्डर'चे ऑफिस आहे. त्या बिल्डरचे प्रोजेक्ट्स वेगवेगळया ठिकाणी सुरू असतात. एखादा प्रॉजेक्ट स्टेशन पासून लांब असेल तर आम्ही लिहीतो, 'फ्री पिक अप फॉम रेलवे स्टेशन'. किंवा 'कॉम्प्लेक्स मधून बसेसची सोय उपलब्ध.' भर जंगलात असेल तर 'निसर्ग सान्निध्यात रमून जा' असे लिहायचे. पाणी नसेल तर 'चोवीस तास नळ' असे लिहा. बांधकाम बेकायदेशीर असेल तर स्थानिक नगरसेवक आणि आमदारांचा आशीर्वाद त्यांच्या फोटोसकट जाहिरातीत यायलाच हवा. सोन्या चांदीची काही दुकाने आहेत. सोन्याचे भाव सदा वाढते असतात. त्यावर लावायला कसल्या स्कीम्स बनवणार? आम्ही मात्र त्यांना सांगतो, मोठा बोर्ड लावा, फ्री! फ्री! फ्री! पुढे लहान अक्षरात लिहा 'दहा ग्रॅम सोन्यावर एक एक रूपयाचे कॉईन फ्री.' फ्री शब्द महत्त्वाचा. एक छत्रीवाला आहे. त्यास आम्ही म्हटले छत्र्यांवर ग्यारंटी कोणीच देत नाही कधी, तुम्ही द्या. फाईन प्रिंट मध्ये टाका, छत्री उन्हात आणि पावसात उघडू नये. पॅराशूट वाल्यास आमचा सल्ला तर असा की अगदी रिप्लेसमेंट ग्यारंटी देऊन टाका. सांगा,विमानातून उडी मारल्यावर पॅराशूट न उघडल्यास पैसे परत, ते ही no questions asked ! टीव्ही वाल्याने तर आमच्या सांगण्य़ावरून मोठे बोर्ड लावले, त्यात मुख्य मजकूर फ्री फ्री फ्री हाच. पुढे एका टीव्ही वर एक सुई,खोडरबर किंवा पेन्सिल फ्री मिळेल यांची आकर्षक चित्रे!मध्ये आमच्या मॉल मध्ये एक जिम उघडले. का कोण जाणे कोणीच फिरकेना. आम्ही म्हटले, लावा बोर्ड पहिल्या पाच मिनिटात दोन किलो वजन कमी होण्याची ग्यारंटी! जिमवाला नवीन होता. गडबडला. आम्ही म्हणालो, डेव्हील इज इन डिटेल्स. नियम आणि अटी लागू. पहिला फ्री आणि ग्यारंटीचा बोर्ड मोठा लावल्यावर नंतरचा मजकूर मुंगी एवढ्या अक्षरात टाका. फक्त तो वाचायला भिंग फुकटात वाटू नका. जिम मध्ये नव्याने अॅडमिशन घेताना अट एवढीच

की सर्व फी नाण्यांच्या रूपात द्यावी लागेल. मग खिशातील नाण्यांसह आधी आणि फी भरल्यावर त्या नाण्यांशिवाय वजन करा. पाच मिनिटांत दोन किलो वजन कमी व्हायची ग्यारंटी. जाहिरातीत फोटो देताना आधीचा फोटो जवळचा द्या आणि वजन कमी झाल्या नंतरचा लांबून काढा. एखाद्या प्रॉडक्ट वर 'सरप्राईज गिफ्ट' द्या. सरप्राईज म्हणजे एखादे चॉकलेट किंवा बॉलपेनाची रिफिल ! एवढ्या मोठ्या खरेदीवर एवढीशी वस्तू पाहून ग्राहकाला सरप्राईज व्हायलाच पाहिजे ! थोडक्यात स्कीम्स बनवणे महत्त्वाचे. 'फ्री' हा शब्द महत्त्वाचा.तुम्ही अगदी तेलात तरंगणारे खाद्य पदार्थ विकत असाल, तर त्यावर 'कोलेस्टेरॉल फ्री' लिहा. कोणी म्हटलेच काही तर सांगा, यातील कोलेस्टेरॉलवर आम्ही काहीच चार्जेस लावत नाही म्हणून. थोडक्यात भाषा महत्त्वाची, फ्री हा शब्द महत्त्वाचा, स्कीम महत्त्वाची. बाकी सर्व 'नियम आणि अटी लागू' मध्ये अॅडजस्ट करा.

असा आमच्या करियरला बहर आला तरी आमचा जीव यात रमत नाही. आम्हाला आमच्या विनोदात रममाण व्हायला आवडते. हीच दुनिया आमची असे वाटते. विनोद हा आमचा प्रांत आहे, आमचे चरावयाचे कुरणच म्हणाना. तरी साहित्य क्षेत्रात आम्ही उपेक्षित किंवा पददलित. आमची पुस्तके छापणारा कोणी नाही. तरी आम्ही आमच्या मार्केटिंगच्या अनुभवातून 'पुस्तकांचा खप कसा वाढवाल?' हे पुस्तक छापले. तर त्यालाच सेल नाही म्हणून दुकानदारांनी ते ठेवायला नकार दिला. आज ते पुस्तक दुर्मिळ आहे कारण कोणीच ते आपल्या दुकानात ठेवत नाहीत. आम्हाला पण म्हणावेसे वाटते, 'आम्ही कोण म्हणून काय पुसता आम्ही असू लाडके, देवाने दिधले असे जगत हे आम्हास हसवावया.' पण ऐकणार कोण? आमच्या लग्ना आधी आमची पत्नी 'तुमच्या

बोलण्यातून चांदणे सांडते' म्हणावयाची, आता सांडलेले चांदणे आवरून ठेवावयास सांगते. अशी आमची घरी नि दारी अवस्था झाली आहे.

पण आम्ही मार्केटिंगवाली माणसे. अशी हार जाणारी नव्हेत. आमच्या साहित्यावर पण नवी स्कीम आम्ही बनवावयास घेतली आहे. साहित्यात ग्यारंटी देणारे आम्ही पहिलेच. अर्थात येथेही 'नियम आणि अटी' लागू. आमचा असा दावाच आहे की 'इस्ट ऑर वेस्ट आय अॅम द बेस्ट.' पाहा. घ्या आमचे पुस्तक विकत. आणि पोटभर हसा. हसून हसून पोट दुखल्यास ती जबाबदारी आमची नाही हा इशारा आम्ही आधीच देऊन ठेवतो. हसण्याची ग्यारंटी. तुम्ही फक्त एवढेच करा, दुकानातून आमचे पुस्तक विकत घ्या आणि वाचा. हसू न आल्यास पैसे परत. यातील मुंगी अक्षरातील मजकूर असा : आमचे पुस्तक वाचताना पु.ल.देशपांडे यांचे कोणतेही पुस्तक बाजूस उघडे ठेवणे आवश्यक. आमच्या दहा पानांनंतर एक पान त्यांच्या पुस्तकातून वाचावे. यानंतर हसू न आल्यास पैसे परत. हा दावा पुस्तक वाचून झाल्यानंतर दहा मिनीटांच्या आत लेखी करावा. सोबत तुम्ही न हसल्याची तीन साक्षीदारांची हमी देणारे लिखित पत्र जोडावे. पुस्तकाच्या किंमती एवढी प्रोसेसिंग फी बरोबर जोडणे आवश्यक. आपला दावा मान्य झाल्यास मनीऑर्डरचे पैसे कापून बाकी रक्कम आपल्या घरपोच पाठवण्यात येईल. मनीऑर्डरीचे चार्जेस वाचवायचे असल्यास आमच्या ग्रेटर नॉयडा या दिल्ली जवळील कार्यालयातून आपण ओळख पटवून समक्ष ही रक्कम घेऊन जाऊ शकता. हसण्याची हमी देणारी आणि मनी बॅक ग्यारंटी वाली ही जगातील एकमेव योजना आहे ! लवकरच आम्ही गिनीसबुकात नाव यावे म्हणून प्रयत्न करणार आहोत.

५

## पं. वा. पोळ : एक द्रष्टा पुरूष

पंढरीनाथ वासुदेव पोळ म्हणजे आमचे लाडके पोळ सर. सरांच्या मृत्युने झालेली पोकळी भरून येणे कठीण आहे. आता फक्त त्यांच्या आठवणी जागवणे एव्हढेच आपल्या हातात आहे.

रूढार्थाने मी त्यांचा विद्यार्थी नव्हतो नि ते ही काही माझे शाळा किंवा कॉलेजातील शिक्षक नव्हते.तरी पण त्यांना सर म्हणण्याचा मला अभिमानच वाटत आला आहे. पोळ सरांची नि माझी ओळख काही वर्षांपूर्वीची. आमचे विषय तेव्हा वेगळे होते, इंटरेस्ट मात्र थोडे सामायिक होते. मी शास्त्राचा विद्यार्थी, नंतर अध्यात्माकडे वळलो. आमची भेट कुठल्यातरी सभेत झाली. नक्की आठवत नाही पण दार्शनिक मंडळाची अध्यात्मिक सभा होती. त्याच्या वार्षिक समारंभाचे पोळ सर अध्यक्ष होते. मी सूत्रसंचालक होतो. सरांचे भाषण झाले. कार्यक्रम पार पडला. काय असेल ते असो. कार्यक्रमानंतर सरांनी जवळ बोलावले. सर एखाद्या रत्नपारख्यासारखे होते हे पहिल्याच भेटीत जाणवले. रत्नपारख्यालाच रत्नांची ओळख असते म्हणतात. त्यांच्यासारख्यांची नजर कशी तीक्ष्ण असते याचे ते उदाहरण होते. मला म्हणालेच सर, 'तुझ्यात नक्कीच काही स्पार्क आहे. अजून खूप पुढे जाशील. माझा आशीर्वाद आहे.' मला आभाळ ठेंगणे झाले. सर एवढे ज्येष्ठ, ते कसे चुकीचे सांगतील?

पुढे सरांशी ओळख वाढली. वयाने मोठे असल्याने सर नेहमीच आधार देत. प्रोत्साहन देत. धीराच्या चार गोष्टी सांगत. पण म्हणून सरांनी आपले श्रेष्ठत्व आमच्यावर लादले नाही कधी. आपल्या कार्याचा आवाका ते जाणून होते. म्हणूनच आम्ही कनिष्ठ असलो तरी आमच्या कामाचा उल्लेख गौरवाने करायला ते कधी कचरत नसत. आमच्या दार्शनिक मंडळात पुढे तात्विक मतभेद झाले. सामान्यांत होतात तशी भांडणे मात्र झाली नाहीत. मी स्वत:चे दर्शन प्रसाद मंडळ काढले. त्यावेळी सरांनी नेहमीच माझी बाजू घेतली. आज त्यामुळे मी जो आहे त्याचे श्रेय सरांचेच आहे. आमच्या या मंडळाचे वार्षिक समारंभ होतात त्यात सर अध्यक्ष पदावरून आम्हाला नेहमीच आशीर्वाद देत असत. त्यातही त्यांचा लोभ माझ्यावर जास्त होता. थोडा आत्मस्तुतीचा गंध जाणवेल पण सरांनी मला घडवले आणि सर जाण्याआधीच्या शेवटच्या सभेत जे म्हणाले ते सर्वांना त्यांनी सांगितले नसेल तरी आता सरांचा मोठेपणा म्हणून सांगायला हरकत नाही. सरांनी आम्हा चारपाच लोकांना जवळ बोलावले. म्हणाले, 'आज मला या यशवंताचा अभिमान वाटतो. मी जर गुरू असेन तर हा माझा शिष्य माझ्याहून सवाई आहे.' आता सरच सांगतात तर ते मानणे भाग आहे. सरांच्या प्रोत्साहनातूनच मी हा माझ्या मंडळाचा पसारा वाढवला. अध्यात्मिक संशोधनात पडलो. अध्यात्मातही शास्त्रीय संशोधनास वाव असतो हे मीच दाखवून दिले. सरांना याचा अभिमान वाटे, म्हणूनच त्यांनी गुरूपेक्षा सवाई म्हटले असावे ना? माझ्या 'कुंडली आणि कुंडलिनी' या विषयावरील एका प्रबंधात मी काही नवीन मुद्दे मांडले होते. सरांना या क्षेत्रात प्रचंड गती होती. सरांचा शब्द अंतिम होता. म्हणूनच सरांना 'शिरोमणी पुरस्कार' मिळाला. सर मात्र नेहमीप्रमाणे नम्रच होते. सर मला म्हणाले, 'तुझे ह्या क्षेत्रातील योगदान माझ्याहूनही जास्त आहे.' किती मोठा माणूस ! आणि मला ते स्वत:हून मोठा म्हणतात? मला अजून तो पुरस्कार नसेल मिळाला पण सरांनी हे म्हणणे हाच मोठा पुरस्कार आहे. गुरूने आपले असे कौतुक करावे याहून कोणता पुरस्कार असेल? सर आता आपल्यात नाहीत हे सत्य पचवणे आता त्यामुळेच जड जाणार आहे.

सरांचा मी इतका लाडका का होतो कोणास ठाऊक? त्यांना स्वत:ची मुले होती. ती या क्षेत्रात नाहीत. अध्यात्मातून मी मी म्हणणारे आपला ’मी’पणा सोडू शकत नाही. पण सर याला अपवाद होते. त्यांनी हा ’मी’पणाचा त्याग केला होता. आणि इतरांचे कौतुक. त्यात प्रामुख्याने माझे कौतुक करण्याचा जणू वसाच घेतला होता. सर सत्यवादी होते. चुकूनही त्यांच्याकडून असत्य कथन होत नसे. असे असताना मला आपल्या योग्यतेबद्दल दुगुणा आत्मविश्वास न येता तरच नवल. त्यांची माया मला लाभली हे माझे भाग्यच म्हणावे लागेल. हे मी त्यांना एकदा बोललो तेव्हा ते म्हणाले, ’यशवंता, अगदी असेच नाही, गुरूसही चांगला शिष्य हवाच असतो की नाही?’ असे सर प्रेमळ होते.

सर नम्रतेचा आदर्श होते. प्रामाणिकतेची मूर्ती होते. त्यांना आमच्या ’जिराफ्स क्लब’चा सन्मान मिळाला तेव्हा याची नव्याने प्रचीती आली. त्यांचे अभिनंदन करायला गेलो. पुरस्कार फार सन्मानाचा होता. सर आनंदात होते. साहजिकच आहे. एवढा मोठा सन्मान मिळावा म्हणून आनंद होणे स्वाभाविक होते. गप्पा झाल्या, खाणे झाले.जायला निघालो. तर सरांनी काय करावे? माझ्याबरोबरीच्यांना बाहेर जाऊ दिले. आम्ही दोघेच उरलो. तसे म्हणाले, ’यशवंता, हा सन्मान तुम्हाला मिळायला हवा होता. पण वय आडवे येते. मिळेल, एक दिवस तुमचाही नंबर येईल.’ त्यांच्या बोलण्यात तथ्य असणार. म्हणजे असणारच. एवढा मोठा माणूस असे नाहीतर कसे म्हणेल? आता सरांचाच आशीर्वाद असा मिळाल्यास हे ही होईल एक दिवस. पण सर ते पहायला नसतील याचे दु:ख आहेच.

सर म्हणजे सौजन्याचे दुसरे नावच होते. त्यांच्या सौजन्याच्या अनेक कहाण्या आहेत. गरजूंना ते आपल्या खिशातून मदत करत. सुदैवाने तशी पाळी माझ्यावर आली नाही. पण सर आपल्या मदतीचा गवगवा कोठेच होऊ देत नसत. मी

त्यांचाच आदर्श ठेवला आहे. आमच्या मंडळाकडून कोणाला मदत देण्यास आम्ही नेहमीच सज्ज असतो. दरवर्षी त्यामुळेच माझे कोणाला मदतीचे चेक्स किंवा गरजेच्या गोष्टी देतानाचे फोटो छापून येताना आमच्या मुखपत्रात दिसतील. दिले दान कोणाला सांगू नये, त्याची वाच्यता करू नये हे मी सरांकडूनच शिकलो.

सरांकडून मी काय काय शिकलो असेन? प्रामाणिकपणा, सत्यवादीपणा, निरपेक्ष वृत्तीने काम करण्याची वृत्ती, पैशांबद्दल निर्मोहीपणा, अखंड मेहनत करण्याची ताकद अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. माझ्या आयुष्याला आकार सरांनीच दिला. सर आता आपल्यात नाहीत यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. सरांचा द्रष्टेपण त्यांच्या विविध भाषणांतून दिसतोच. त्यांच्या आखून दिलेल्या मार्गावर चालत राहणे एवढेच आता आपल्या हातात आहे. सरांच्या आत्म्यास शांती लाभो हीच प्रार्थना.

*( मनुष्य स्वभावाचा हा एक नमुना. कित्येक मृत्युलेखांतून हा दिसतो. कित्येक व्यक्तींच्या चरित्रात ते चरित्र लिहिणाराच जास्त डोकावतो किंवा लिहिणारा आपण कसे ग्रेट हे त्या चरित्र नायका तोंडून वदवून घेतो. बिचारा चरित्र नायक अडगळीत पडल्यासारखा उद्धाराची वाट पाहात पडतो. एखाद्याच्या चरित्रात डोकावणारी ही 'आय,मी, माइन, मायसेल्फ' माणसे नक्कीच दुर्मिळ नाहीत ! )*

६

## मी (गद्य) लेखक कसा झालो?

### *अर्थात एका महाकाव्याचा अंत*

मी सकाळ सकाळी अभ्यासाच्या टेबलावर बसून लिहीत होतो.

कालच रात्री मी आत्मपरिक्षण मोड मध्ये गेलो होतो. समर्थ सांगून गेलेत, दिसामाजी काहीतरी लिहित जावे म्हणून. आणि मी? ऑफिसातल्या चार दोन सह्या वगळता लिहिण्याशी माझा संबंध उरला नाही. थू माझ्या जिनगानीवर असे वाटले. थू करायला ही जिनगानी कुठे सापडेल याचा विचार करत झोपी गेलो.

सकाळी उठलो तर म्हटले हे काही खरे नाही. बदल डालो सबकुछ म्हणत सरळ लिहायलाच बसलो. काय लिहू? याचा विचार करायला लागलो. गद्य लोहावे की पद्य? वाटले कविताच लिहावी. मी तसा कविमनाचा नाही पण पद्य तसे सोपे. आपल्याइथे कवितेची मोठी परंपरा आहे. तीन ओळींच्या हायकू, चार ओळींच्या चारोळयांपासून खंडकाव्य महाकाव्या पर्यंत. महाकवि कालिदासापासून पुढे मागे माझ्यापर्यंत. म्हणून ठरवले, कविताच लिहायची.

माझी खासियत ही की मी लहानसहान विचारच करू शकत नाही. काव्यच लिहायचे तर तीन चार ओळींचे नव्हे तर चांगले असंख्य, अनंत ओळींचे महाकाव्य म्हणजे अनंतोळी लिहावे. लागेल थोडा वेळ पण दिसामाजी चाराठ ओळी लिहिल्या तर वर्षा दोन वर्षात सहज लिहून होईल. कालिदासाचे स्मरण करून लिहायला बसलो. एकदा ठरवले की ठरवले. निश्चयाचे तेज मला वाटते माझ्या चेहऱ्यावर झळकत असावे. मागे ऋषिमुनी तप करायला बसत नि मग पोथ्या पुराणे लिहायला घेत. मोठे मोठे कवी लोक थंड हवेच्या ठिकाणी जाऊन स्फूर्ती येण्याची वाट पाहतात. स्फूर्ती देवता प्रसन्न व्हावी म्हणून काय काय करतात. त्यांच्या घरी त्यांना सांभाळून घ्यायला लोक असतात. मी या सर्वांची तमा न बाळगता महाकाव्य लिहायला बसलो म्हणजे बसलोच. काव्याचे नाव ही ठरवले, काव्यानुभूती. यात मी कवितेचा विविधांगांनी विचार करणार होतो.

चार ओळी होतात न होताच तो बायको आली. तिने मला डायनिंग टेबलावर पाहिले आहे पण अभ्यासाच्या टेबलावर पाहून दचकली.

’अहो, काय करताय?’

’लिहितोय.’

’ते दिसतेय, पण तुम्ही काय लिहिताय?’

’म्हणजे? मी लिहू शकत नाही? काव्यरचना करतोय.’

’क्काय? कसली रचना?’

’काव्य, कविता. नुसते काव्य नव्हे तर महाकाव्य. या कुत्सित वृत्तीच्या दुनियेची तमा मज नाही. आता एकच ध्येय. काव्य, नव्हे महाकाव्य. हे ऐक’

**हे असे लिहितो असा जे कसे लिहिलेच नाही**
**काय तू ऐकशी गड्या रे जे जणु ऐकलेच नाही**
**का कुणी व्यर्थ आता वेळ आपुला दवडावा**
**का कुणी ऐकवाया कान अपुला शिणवावा.**

’हे काय नवेच खूळ?’

’खूळ? तुला हे खूळ वाटले? समर्थ म्हणालेत, दिसामाजी काहीतरी लिहावे म्हणून.’

’कोण म्हणाले?’

’रामदास स्वामी खुद्द.’

’बरे बरे. पण काहीतरी लिहावे म्हणालेत ना. काहीतरीच नाही. ही ’च’ वर जोर देत म्हणाली.’

मराठी भाषा कशी लवचिक आहे नाही? एका ’च’ ने अर्थ बदलतो.

आंग्ल भाषेत एक म्हण आहे म्हणे, ’प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एक स्त्री असते, तो करणारी प्रत्येक गोष्ट चुकीची आहे सांगणारी.’ इथे तर सुरूवातीसच मी चुकीचेच सर्व करतोय असे सांगणारी धर्मपत्नी भेटली. म्हणजे मी यशस्वी होणारच. या धुंदीत मी पुढील ओळी लिहून टाकल्या,

**का कुणी हिणवे मला इथे काय मी कवीच नाही?**

**कॊण म्हणतो चार ओळी म्हणजे सुद्धा कविताच नाही**

**काव्य माझे महाकाव्य माझे**

**दरदिनी लिहीता मी जणू कविताच आहे.**

मी नेटाने लिहितच राहिलो. बायकोला ऐकवायचा धीर मात्र झाला नाही. माझा काव्य शास्त्र विनोदात रुचि असणारा एक मित्र आहे, मनोहर इंगळे. त्याच्याकडे गेलो.

'काय आज इकडे कुणीकडे?'

'मन्या, आज जरा रस्ता चुकलो खरा. पण महाकाव्य लिहायचा मी निश्चय केलाय म्हणून आलो.'

डायरेक्ट विषयाला हात घालत मी म्हणालो.

'क्काय? बायको जशी उडाली होती तसाच मनोहर ही बसल्या जागी उडाला.'

'येस, कविताच. कविताच नव्हे तर महाकाव्य. मी सुरूवात ही केलीय. ऐक.'

मी त्याला माझे काव्य वाचून दाखवले. तो तल्लीन होऊन ऐकतोय असे वाटले. त्याचे डोळे बंद होते. एवढ्या लवकर त्याला झोप लागणे शक्य नव्हते. कविता ऐकून भान हरपले असावे. आठ दहा ओळी वाचून झाल्यावर मी म्हणालो,

'तसे सोप्पेय रे. मोठी कविता लिहायची, मग एनलार्ज करायची की झाले महाकाव्य.'

यावर मनोहरने काय म्हणावे?

'तू मांजर पाहिलीयस?'

'अर्थात. पण मांजरीचा इथे काय संबंध?'

'आहे. वाघाची मावशी एनलार्ज करून वाघ बनत नाही. तो ओरिजिनलच हवा.'

'ठीक आहे. ओरिजिनलच महाकाव्य लिहितो मग तर झाले. मला तुझी मदत लागेल मन्या.'

मन्या विचारात पडला असावा.

'तू गद्य काहीतरी लिही.'

'ते नंतर रे मन्या. प्रथम हे काव्य हातावेगळे करतो मग गद्याकडे वळतो. आधी लग्न महाकाव्याचे. नंतर कथा, कादंबरी आणि ललित लेखनात विहार करीन. जमलेच तर काही विनोद, अनुवाद नि चरित्र लेखन आहे. फक्त ती समीक्षा नि आत्मचरित्र लिहायला सांगू नकोस.'

मी मन्याला बोलण्याची उसंत न देता म्हणालो.

'तुझा काहीतरी गैरसमज झाला वाटते. मला *त्यापेक्षा* तू गद्य लेखनाकडे वळ असे म्हणायचे होते.

'त्यापेक्षा?' एका शब्दाने अर्थ किती बदलतो नाही. मराठी भाषा लवचिक खरी.

तो पुढचे वाक्य म्हणाला तेव्हा माझ्या बायकोचे नि त्याचे एकमत असल्याचे मला जाणवले.

इजा बिजा झाला. आता तिजा नको म्हणून मी अजून कोणाला दाखवायला नको म्हणून माझी कविता कोणाला वाचून दाखवली नाही. विचारात पडलो. काव्य मला आवडते. यमक जुळवायची धमक असली कवितेत चमक आणता येते. गद्याचा पसारा मोठा. पद्य आटोपशीर. म्हणजे महाकाव्य पण आटोपशीर. त्यापेक्षा या एका शब्दाने माझा काव्य संसार मोडला. माझ्यातला कवी पिकले पान खुडावे तसा खुडला गेला. माझा कवितेशी काडीमोड झाला आणि गद्याशी संसार सुरू झाला. नाइलाजाने मी गद्य लेखनाकडे वळायचे ठरवले. पूर्वी लोकाग्रहास्तव जुन्या सिनेमांचे शो लावत. कोण कोणाला ’प्लीज हा सिनेमा दाखव, दाखव ना प्लीज’ म्हणायला जायचे कोणास ठाऊक? पण जाहिरातीत ’लोकाग्रहास्तव’ लिहिलेले असायचे. मला लोकाग्रहास्तव पद्यलेखनाकडे पाठ वळवावी लागली. आणि गद्याकडे वळावे लागले. थोडक्यात मी गद्यलेखनाकडे वळलो तो लोकाग्रहास्तवच. लोकांनी माझ्यातला कवी खुडला. आणि त्यात माझ्या महाकाव्याचा बळी गेला.

७

## व्यथा एका कथालेखकाची

एक एक दिवस कसा भाकड उगवतो. भाकडपणाची तशी काही वेगळी व्याख्या नाही. अट्टल चोराची, अट्टल दारूड्याची आणि अट्टल प्रेमीची भाकडदिवसाची कल्पना वेगळीवेगळीच असणार. एखादा चोर घ्या. आपल्या कर्तव्यासाठी तो रात्रंदिन मेहनत करतो. जिवावरचा धोका पत्करून कोणाच्या घरात शिरतो. शेवटी त्या घरात त्याला काहीच मिळत नाही. मग त्याला तो दिवस भाकडच वाटणार. ( जाता जाता : चोरलोकांचा काळ्या पट्टूयांचा पांढरा टी शर्ट किंवा पांढऱ्या पट्ट्यांचा काळा टी शर्ट आणि रात्री सुद्धा घालायचा काळा गॉगल नि डोक्याला बांधलेला ठिपक्यांचा रूमाल असा युनिफॉर्म असतो अशी दिवाळी अंकातील समस्त कार्टून्स पाहून माझी समजून होती. पण माझ्या आयुष्यातला पहिला चोर मी पाहिला तो मात्र अर्ध्याचड्डी आणि बनियान मध्ये होता ) अट्टल दारूड्याची कथा वेगळी. लागोपाठ दोन दिवस ड्राय डे असावेत. आणि पहिल्याच दिवशी सगळा साठवलेला स्टॉक संपून गेला तर दुसरा दिवस भाकडात गणला जाणार. अट्टल प्रेमीजनांसाठी भाकडदिन.... जाऊ देत. भाकडदिवसाचा अर्थ ज्याने त्याने आपापल्या मगदुराप्रमाणे आणि कल्पनाशक्तीनुसार लावावा. माझ्या सारख्या कथालेखकास नवीन काही कथाविषय सुचत नाही तोच माझ्यासाठी भाकडदिवस हे मात्र खरे.

कितीतरी वर्षांपासून मी कथा या साहित्यप्रकाराची सेवा करतोय. ( सेवा म्हटले म्हणून सरकार यावर सेवा कर तर लावणार नाही ना? ) मी माझ्या कथांमध्ये आजपर्यंत काय काय नाही लिहीले? एक नायक, नायिका, खलनायक नि खलनायिका, सासू सुना, सासरे नि दीर, कोणाकोणाचे आई नि बाप. सर्वांना मी माझ्या कथांत स्थान

दिले नि आवाज दिला. सासु सुनांत मी कधी प्रेमाचे नाते दाखवले कधी सासऱ्यास प्रेमळ दाखवले तर कधी दुष्ट. सासू सुनांचे कधी खलबत्त्यासारखे नाते दाखवले. म्हणजे कधी सासू खल असेल तर सून बत्ता, तर कधी सून खल नि कुटणारी कुटील सासू म्हणजे बत्ता. माझ्या कथांतून किती पात्रे आजवर आली नि वेगवेगळया प्रकारे वागून गेली. नायिका बागडून गेल्या, आपापल्या लीला दाखवून गेल्या तर कधी विरहाने व्याकूळ होत आसवे गाळून गेल्या. हीरो आले. आपापल्या हिरवणींवर इंप्रेशन मारून गेले. विलन नि विलनी आले आपापली दुष्कृत्ये करून गेले. हीरो साऱ्यांना कधी पुरून उरले तर कधी हार मानून देवदास झाले. जशी कथावस्तू तशी त्यांची मांडणी मी केली.

माझे म्हणजे मागणीनुसार रसनिष्पती करून कथा लिहिण्याचे दुकानच आहे म्हणाना. शेवटी कथा कथांतून रसनिष्पत्ती महत्त्वाची. मग तो कुठला ते आपण ठरवायचे. उदाहरणार्थ वीररस हवाय तर नायकाला सैनिक बनवा किंवा अन्यायाविरूद्ध लढताना दाखवा. शृंगाररस सर्वात सोपा. टीव्ही किंवा हिंदी सिनेमा पहा. घ्या एक हीरो नि एक हिरॉईन. पुढे काय सर्व सोपेच सोपे, आणि पॉप्युलर पण तेवढेच. करूण रस हवाय? घ्या दोन आयाबाया. वाटा त्यांना दोन चार चांगली दु:खे, रडवा नि झाली की करूण रसाची निर्मिती. हास्यरसासाठी पात्रे कुठलीही चालतात. त्यातल्यात्यात राजकारणी वगैरे असले की त्यांच्या बोलण्यातून हा रस नुसता वाहात असतो. काही नाहीतर निवडणूक जाहीरनामा जरी छापला तरी हास्यरसाचा धबधबा वाहू लागतो. तशी बीभत्स रसाची मागणी जास्त नाही पण कोणी केली तर मी मागे हटत नाही. मी मग दोन एकमेकांविरूद्ध ठाकलेले ( स्वपक्षीय वा विपक्षीय ) नेते घेतो त्यांना समोरासमोर बसवतो आणि बीभत्सरसाची भरपूर निर्मिती करतो. सांगायचे काय तर मी मागणी तसा पुरवठा करण्यात मागे हटत नाही.

कथा म्हणा किंवा नुसते लेखन म्हणा त्याला भरपूर व्यासंगाची जरूरी असते. देशी विदेशी साहित्याच्या वाचनाची गरज असते. त्यात मला नवनवीन कल्पना मिळतात. त्याकथांतून हाताळलेल्या विषयांतून मला माझी कथाबीजे ( वा ! हा शब्द मस्त आहे ! ) मिळतात. मग मी माझ्या कथांचे घाणे पाडायला बसतो. घाणे पाडणे म्हटले म्हणून दचकू नका. शेवटी मी एक लेखकच आहे. हवे तिथे हवे ते शब्द चपखल बसवणॆ माझे कामच आहे ना. त्यामुळे हा घाणा शब्द मुद्दामच वापरला आहे. आमचे कुटुंब दिवाळीवर जगते म्हणाना. मी इथे जून जुलैत ऑर्डरप्रमाणे दिवाळी अंकातल्या कथा पाडतो नि नंतर माझी बायकोदिवाळी फराळयाच्या चकल्या नि शंकरपाळे पाडायला घेते. म्हणजे मी कथांच्या बल्क ऑर्डर्स घेतो नि ही फराळाच्या. ( माझ्याहून ही जास्त कमावते हे मात्र खरे )

आज पंधरा जून उलटून गेली. पोरांच्या शाळा सुरू झाल्या. दप्तरे, वह्या पुस्तके आली. नेमेचि म्हणून हजेरी लावायला पावसाळा आला. बेडकांचे डराव डराव आले. एवढी वातावरणनिर्मिती झाली. पण...

कोठे आटलाय माझ्या प्रतिभेचा झरा? नळातून धो धो पाणी यायचे तिथे हा कसला ठणठणाट ? कोणी नायक नायिका मदतीला येईनाशा झाल्या. एवढा व्यासंग पुरे पडेनासा झाला. आता नवीन काही सुचत नाही. संपादकांस काय सांगू? एवढा दिवाळीचा सिझन गेला की कोण विचारणार मला? एकेक दिवस असा भाकड जातोय. आजचाही तसाच गेला. आता मी काय करू ?

# ८

## मी आणि माझे भविष्य

*शहाणी माणसे ज्योतिषांच्या सल्ल्यानुसार चालतात, फक्त कुंडलीत चांगला ज्योतिषी मिळण्याचा योगमात्र हवा : पु.ल.देशपांडे*

मी शहाणाही आहे आणि कुंडलीत चांगला ज्योतिषी मिळण्याचा योगही आहे. काही जण मला अतिशहाणा किंवा दीडशहाणा समजतात हा भाग वेगळा. आज काल सिझेरियन करून योग्यवेळी बाळाला जन्माला आणून प्रत्यक्ष नशिबाला चिटिंग करायची पद्धत म्हणा किंवा सोय म्हणा, आहे. ४० वर्षांपूर्वी म्हणजे माझ्या जन्मावेळी हे नव्हते. त्यामुळे सटवाईने वेळ आणि ठिकाणानुसार कपाळावर लिहिलेल्या नशिबाप्रमाणेच सर्व घडणार हे नक्की. नेमके ते काय आहे हेच ज्योतिषीच वाचू शकतात आणि त्यातून मार्ग ही काढून देऊ शकतात.

माझ्या सुदैवाने अगदी १६व्या वर्षीच मला अत्रेशास्त्री म्हणून ज्योतिषी भेटले. कित्येक ज्योतिषी भविष्याच्या नावाखाली आपल्याला आधीच माहिती असलेला भूतकाळभविष्य म्हणून खपवतात आणि भविष्याबद्दल नक्की न सांगता ढोबळ विधाने करतात. अत्र्यांचे तसे नाही. त्यांच्या भविष्यकथनातील अचूकता थक्क करणारी आहे. त्याचे अनुभव पदोपदी येत असतातच पण आमच्या घरी हिला त्यावर विश्वास दाखवायला आवडत नाही. त्या ज्योतिषावरून ही टोचत असते. अर्थात हा पत्नीधर्म आहे त्यामुळे नवरा जे म्हणेल त्याला विरोधी पक्षाप्रमाणे विरोध करणे हा तिचा धर्मच आहे, या अर्थाने ती अत्यंत धार्मिक आहे म्हणायला हरकत नाही. अर्थात अत्र्यांच्या

भविष्यकथनाच्या नंतर कित्येक वर्षांनी माझे लग्न हिच्याशी झाले पण तिला एकदा उत्साहात सर्व भविष्य सांगितले आणि तिचा पत्नीधर्म जागा झाला.

तो दिवस मला अजून आठवतो. अत्रेशास्त्री माझी कुंडली मांडून बसले होते. नुकतीच शाळा संपली होती. रिझल्ट तेवढा बाकी होता म्हणून अतिआनंदात सर्व सुरू होते. प्रथम त्यांच्या कपाळावर आठ्या होत्या पण त्यांनी नंतर माझा हात देखील पाहिला आणि ते जाळे जरा विरळ झाले होते. पुढे त्यांनी कथनास सुरूवात केली होती. माझ्या बाल कम तरूण मनावर त्याचा कसा परिणाम झाला होता हेही आठवते.

कुंडलीतील प्रभावी रंग म्हणून लाल रंग असेल असे अत्रेबुवांनी सांगितले होते, मला व्यासंगाची आवड राहिल त्यामुळे एखाद्या विषयाचा किस पाडण्याची सवय राहिल, शिक्षण ग्रॅज्युएशन पर्यंत पण त्यात अडथळे यायची शक्यता आहे. लेखणीचा संबंध असणारी नोकरी मिळेल आणि लग्न वयाच्या विशीनंतर केव्हाही संभवते. पण याही दोन्हींत अडथळे संभवतात. पत्नी मनमिळाऊ असेल आणि लग्नानंतर उत्कर्ष होईल. घरबांधणीशी जवळचा संबंध येईल. वयाच्या साठाव्या वर्षी एक वजनदार व्यक्ती म्हणून निवृत्तीचा योग राहिल. एकूण आयुष्य सरळसोट राहिल.

हे सर्व पुढे खरे झाले असले तरी एक मात्र चुकले त्यांनी पत्नी मनमिळाऊ असल्याचे म्हटले होते, बहुधा असे म्हणण्याची पद्धत असावी नाहीतर हे दोन विरोधी अर्थांचे शब्द एका दमात कोणी उच्चारलेच नसते !

लाल रंगाच्या प्रभावाखाली सर्वप्रथम मी आमच्याच बिल्डिंगीत राहणाऱ्या एकमेव कॉम्रेड जमनाडेंना भेटलो. कॉ.जमनाडेंच्या घराचा रंग ही लाल आणि दरवाजा खिडक्याही लाल रंगाच्या होत्या. त्यांना म्हटलं, 'लाल सलाम कॉम्रेड जमनाडे काका, मी कम्युनिस्ट व्हायचे ठरवलेय' तर त्यांनी हातावर Das Capital चा

जाडजूड ग्रंथ ठेवला. पुढे ते काही बोलणार त्या आधी मी म्हटले, 'काका, मुंबई डासांची कॅपिटल असेल पण त्याचा कम्युनिस्टांची काय संबंध? ते तर महापालिकेतही सत्तेत नाहीत.' जमनाडे उखडले असे चेहऱ्यावरून दिसत होते. काहीच न बोलता त्यांनी पुस्तक हातातून ओढून घेतले, मला बाहेर ढकलले आणि तो लाल दरवाजा माझ्या तोंडावर बंद करून घेतला. एक शब्दही न बोलता कॉ.जमनाडेंनी माझ्यातला लाल कम्युनिस्ट संपवला. पुढे म्हणून मी राजकारणाकडे कधीच वळलो नाही पण कुंडलीतला लाल रंग पाठ कशी सोडणार?शाळेप्रमाणेच पुढेही तोच लाल रंग माझ्या प्रगतिपुस्तकातील सर्वात प्रभावी रंग असे !त्या लाल रंगाचा प्रभाव अगदी बी.ए. च्या फायनल पर्यंत टिकला. अत्रेशास्त्री म्हणाले तसा मी अभ्यासू होतो. एकेका वर्षाचा अभ्यास मी खूपच डिटेल मध्ये करीत असे आणि दोन वर्ष त्याला लागली तरी त्याची मला काळजी नसे. बाकीचे विद्यार्थी पुढे गेले म्हणून मला खंत नसे कारण मला त्याच विषयाचा अधिक सखोल अभ्यास करायचा असे. तसाच मी फायनलला मात्र तीन वर्षांचा व्यासंग केला. शेवटी बी.ए. ची पदवी मिळाली आणि माझ्या व्यासंगाचा अंत झाला आणि अत्र्यांचे दुसरे भविष्य तंतोतंत खरे ठरले. व्यासंग ही झाला, सर्व विषयांचा किस ही झाला आणि शिक्षणात अडथळेही झाले.

फायनलचा फायनल रिझल्ट फायनली आला तेव्हा आईबाबांच्या जिवात जीव आला पण मी मात्र बिनधास्त होतो कारण मला भविष्य ठाऊकच होते. नोकरी मिळणारच होती. फक्त आता पुढे नोकरीचे काय होणार? लेखणीशी संबंध म्हणजे कारकूनी? की एखाद्या कंपनीचा सीईओ? की एका फटकाऱ्याने होत्याचे नव्हते किंवा नव्हत्याचे होते करणारा राजकारणी? अर्ज करायच्या निमित्ताने लेखणीशी भरपूर संबंध आला, तेव्हा कॉम्प्युटर नव्हते म्हणून सर्व लिहावेच लागायचे. नोकरीत पण अडथळे येतील म्हणालेच होते शास्त्रीबुवा. शेवटी एका बांधकाम कंपनीत क्लार्क म्हणून लागलो. अशा रितीने लेखणीची संबंध आलाच आणि घरबांधणीशीही आला.

हल्ली बरंय, कोणाला क्लार्क बिर्क म्हणत नाहीत तर सेल्स मॅनला सेल्स एक्झिक्युटिव्ह किंवा मार्केटिंग मॅनेजर म्हणतात. तसा मी टाइपिंग एक्झ्युकिटीव्ह होतो. तरीही तेव्हाच्या क्लार्क म्हणण्याच्या पद्धतीने लग्नात ही शास्त्रीबुवांच्या भविष्यानुसार अडथळे आलेच. आता पगार आणि काम काहीच न बदलता मी मॅनेजर- डॉक्युमेंट्स झालो आहे. म्हणून हिला मैत्रिणींना सांगायला बरे तरी वाटते की 'मिस्टर मॅनेजर आहेत एका फर्म मध्ये' म्हणून. म्हणजे झालाच ना लग्नानंतर उत्कर्ष. लग्नाचीही अशीच गंमत झाली. माझ्या नोकरीमुळे, म्हणजे आधी ती नव्हती म्हणून आणि नंतर ती कारकूनाची होती म्हणून असंख्य जणींकडून नकार येई पण मी बिनधास्त, लग्न प्रत्यक्ष होईपर्यंत तेहेतिसावे वर्ष उजाडले पण वर्तवलेल्या भविष्याप्रमाणेच विसावे वर्ष उलटून गेलेलेच होते तोपर्यंत. हिच्या मनमिळावूपणाचा अपवाद सोडला तर सर्व काही सांगितल्याप्रमाणेच घडत गेले आहे आजपर्यंत, आता फक्त रिटायरमेंटची वाट पाहायची. त्याला ही अजून वीस वर्ष बाकी आहेत अजून. आजच मी ८५किलो पर्यंत पोहोचलोय तर साठीपर्यंत आणखीनच वजन वाढेल एवढे नक्की. त्यामुळे रिटायरमेंट च्या वेळी मी एक वजनदार व्यक्ती म्हणूनच रिटायर होईन. लोक चाळीशीनंतर तरी स्वत:चे घर बांधायला किंवा शोधायला लागतात, मी घरबांधणी अगदी गेले बारा वर्षांपासून करत आहेच फक्त ती दुसऱ्यांसाठी एवढेच. शास्त्रीबुवांची एवढी सारी भाकिते खरी झाली पण हिचा तरी विश्वास नाही म्हणे, म्हटले, 'आण तू अविश्वास प्रस्ताव पण मला तो नामंजूर आहे.' शेवटी तिने माझा याबाबतीत नादच सोडला आहे.

असे असले तरी डे टू डे म्हणजे शॉर्ट टर्म भविष्याबाबतीत मात्र मला एवढे पटकन यश नव्हते. म्हणजे आज पिवळा शर्ट घालावा की पोपटी किंवा आज गरम पाणी प्यायले तर तब्येत बरी राहील की कोमट अशा गोष्टींकरता मला योग्य मार्गदर्शन मिळायला कितीतरी कष्ट पडले. अर्थात ते मला कित्येक वर्ष कुठून ना कुठुन मिळतेच

आहे. सर्व प्रथम मी काय केले की दररोज सकाळी उठून पेपरातले भविष्य वाचायचे. लोकं पेपरच्या हेडलाईन्स वाचतात. आजकाल तर पहिल्या पानावर पण हेडलाईन्स ऐवजी जाहिरातीच असतात हा भाग वेगळा. पण काही वर्षांपूर्वी हे नव्हते. काही दिवसांत ते काही बरोबर जमत नाही असे दिसले तेव्हा मी दररोज सहा पेपरांतील भविष्याचा तौलनिक अभ्यास केला. इथे मला माझी अभ्यासू आणि व्यासंगी वृत्ती उपयोगी पडली. त्यात एकाच दिवशी एका पेपरात 'प्रकृति अस्वास्थ्य' तर दुसऱ्यात 'तब्येत सुधारेल.' तिसऱ्यात त्याच दिवशी प्रकृतीबद्दल काहीच न येता 'आनंदी व्हाल' असे भविष्य. तर चौथ्यात 'निरुत्साह' ! मी रितसर सर्वांचा महिनाभर चार्ट बनवून पाहिला. कोणाचे किती भविष्य खरे ठरते पाहून माहितीचा अभ्यास केला. महिन्याभराच्या माहितीच्या अॅनालिसिस वर शेवटी 'दैनिक कटकट' चे भविष्य सर्वात करेक्ट असे दिसले आणि मी दररोज तोच पेपर वापरायला सुरूवात केली. कोणी पेपरचे पहिले पान वाचतात, सकाळी सकाळी तसे मी भविष्याचे पान वाचू लागलो. त्यात कधी 'वाहन सौख्य' असे तर कधी 'वाहन दु:ख.' कधी 'पोटदुखी' तर कधी 'समाधान.' त्या भविष्याप्रमाणे मी वागत असे आणि 'दै. कटकट' च्या ज्योतिष्याला बरे वाटेल असे वागत असे. पुढे काय झाले कोणास ठाऊक पण तो चार पानी पेपरच बंद पडला आणि माझे भविष्यच अंध:कारमय झाले. पेपर बंद पडायच्या आदल्या दिवशीचे भविष्य होते, 'पुढे धोका,सांभाळून चाला.' ते खरे ठरण्याची लक्षणे दिसत होती. ते दिवस कठीण होते फारच. भविष्यच ठाऊक नाही तर चाचपडायला होणारच.

मग टीव्ही मदतीस धावून आला. चॅनेलांचा रतीब सुरू झाला, '२४ तास न्यूज' नावाची करमणूक प्रधान चॅनेल्स सुरू झाली. दररोज सकाळी आजच्या भविष्याचा डोस चहा पितापिता मिळायला लागला आणि माझा प्रश्न सुटला. मी'MY मराठी' चॅनलवरील दैनिक भविष्य ऐकू लागलो. आणि माझा प्रश्न कायमचा सुटला. एक गंभीर चेहऱ्याचे ज्योतिषी पार्वतीकुमार सर्व राशींचे भाकित करतात. ही त्याला

'चिरफाड करतात' म्हणते. प्रश्न ज्याच्यात्याच्या श्रद्धेचा आहे. माझ्या राशीचे भविष्य ऐकल्यानंतरच माझा दिवस सुरू होतो. आज 'वाहनसौख्य' ऐकल्यावर मी ट्रेनच्या फंदात न पडता सरळ टॅक्सीने येतोजातो. 'प्रकृती अस्वास्थ्य' म्हटले तर लगेच सुट्टी आणि डॉक्टरची भेट.डॉक्टरांना सांगायला मला काहीच होत नसेल तर मी त्यांनाच काही आजार दिसतोय का बघायला सांगतो, त्यांना कदाचित थोडा स्क्रू ढिला वाटत असावा बहुतेक वेळी. कधी 'भेटीगाठी घडतील' म्हटले तर लांबलांबच्या नातेवाईकांकडे सुट्टी टाकून जातो आणि ते सर्व पण मला पाहून चाट ! मला शर्ट पँट पण कोणती घालायची यासाठी सकाळचा लकी कलर ऐकावा लागतो, हवा तो कलर मिळावा म्हणून माझ्याकडे सर्व रंगातले कपडे तयार आहेत, म्हणजे लाल शर्ट,पोपटी कलरची पँट किंवा जांभळया कलरची पँट सुद्धा आहे. त्यामुळे मी एकदा लाल शर्ट आणि खाली जांभळी पँट घालूनही ऑफिसला गेलेलो आहे. याबाबतीत नो कॉंप्रोमाइज. शेवटी प्रश्न भविष्याचाआहे. ही गोष्ट मी हिला पण लागू करायला गेलो तर हिचा स्टोव्ह चा उडावा तसा भडका उडला. तुमचे तुम्ही पहा आणि घाला गोविंदासारखे कपडे किंवा जा सर्कशीत विदूषकासारख्या वेशात. ही असे म्हणाली आणि मी तिचा नाद सोडला.

मोठी मोठी माणसं सांगून गेलीत, आपले भविष्य आपल्याच हाती आहे म्हणून, त्यामुळे हातावरच्या रेषा खोटे कसे सांगतील? 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' म्हणतात, तेव्हा आपल्याला समजणाऱ्या भविष्याकडे लक्ष द्यायचे नि त्याप्रमाणे वागयचे की तिकडे दुर्लक्ष करायचे हे ज्याने त्याने ठरवायचे आहे. शेवटी प्रश्न ज्याच्या त्याच्या आयुष्याचा आहे.

९

## ही :एक करवादिनी

**महाराज म्हणितले: पूर्ण जगत: वासनं घर्ष्र्ययति वासन:**

आद्य महाराज श्री.उभेश्वर. इ.स.२०१-२५५. 'भांडियांचा दृष्टांत' या पुस्तकात त्यांनी हा बोध दिला आहे. उभेश्वर महाराज लग्नानंतर काही काळ संसारी आयुष्य जगले पण त्यांची पत्नी ही पूर्वाश्रमीची आवडाबाई असावी असा पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांचे मत आहे त्यानुसार ते पळून विंध्यपर्वतावर गेले. तेथे एका पायावर उभे राहून तपाचारण केले. तेथे त्यांना दिव्यदृष्टी मिळाली आणि ते परत आले. त्यानुसार समोरच्या माणसाच्या मनातील विचार त्यांना वाचता येऊ लागले. तो चष्मा घालून ते घरी आले आणि आपल्या बायकोच्या मनातील विचार पाहून परत आपले विंध्यपर्वतात पळून गेले. त्यांनी स्वानुभवावरून हा बोध लिहिला असावा.

**Pots clasheth pots**

विल्यम शेक्सपियर. हे शतकांपूर्वीचे एक युरोपियन इंग्लिशमधील महान लेखक असून त्यांच्या साहित्याची अजूनही चोरी केली जाते यावरून त्यांचे महानपण ध्यानात येईल. यावरून तिकडे 'अखिल इंग्लंड शेक्सपियर बचाव समिती'ची स्थापना केली गेली असून त्यांनी आमच्या साहित्यावर चोरीचे आक्षेप घेतले असून त्यावरून आम्ही आणि अ.इं.शे.ब.स. मधे भांड्यास भांडी लागली. आम्ही त्यावर नावात काय आहे

असे शेक्सपियरनेच म्हटल्याचा दाखला दिला, त्यामुळे 'विल्यमने म्हटले काय नि ह्या अनंत कुळकरण्याने म्हटले काय काय फरक पडतो?' असा सवाल करून त्यांची बोलती बंद केली. त्यावर इथल्या प्रथेप्रमाणे त्यांनी आम्हास काळे फासण्याचे ठरवले पण आमच्या वर्णावर फासलेले काळे दिसणार नाही म्हणून तो बेत मागे पडला. शेवटी इंग्लंड आणि भारताचे राजनैतिक संबंध बिघडू नये म्हणून आम्ही माघार घेतली,

**सकल जन, भांडण तंडण**

**भांडण तंडण करीती सकल जन**

महाराष्ट्र लोकगीते खंड २ पृ.३५४६, महाराष्ट्र सरकार प्रकाशित इ.स.१९५६

**घर म्हटले की भांड्यास भांडे लागायचेच**

सुप्रसिद्ध लेखक श्री. अनंत विठ्ठल कुळकरणी.जन्म इ.स.१९५५. त्यांनी विपुल लेखन केले असून त्यांच्या 'वाचकाच्या शोधात एक लेखक' या आत्मचरित्रातील हे सुवचन प्रसिद्ध आहे.

*****

वरील महापुरूषांच्या महावचनांवरून भांडणे हा मनुष्याचा स्थायी स्वभाव आहे हेच दिसते. महापुरूष नेहमी योग्य तेच सांगतात. फक्त आमच्याकडे माझ्याकडे त्यासाठी श्रोत्याची भूमिका असते.एरव्ही टाळी एका हाताने वाजत नसेल पण आमचे येथे एकतोंडी भांडणे होतात.

आमचे घर तर भांड्यांचाऑर्केस्ट्रा आहे. तिथे भांड्यांचा ऑर्केस्ट्रा सतत वाजत असतो आणि आमची ही त्याचॊ म्युझिक डायरेक्टर.

आमच्या घरी ’पहाट झाली. भैरूची बायको उठली आणि भांडायला लागली’ अशीच स्टोरी असते. हे ही अगदी उत्स्फूर्त.

दूधवाल्याने १५ मिनिटे दूध उशीरा टाकले की ही मला ओरडते, ’तुम्ही खूप मऊ आहात म्हणून त्याची अशी हिंमत होते.’ त्यावर तोंडाची वाफ एवढी दवडली जाते की तिच्यावर एक लिटर दूध तापू शकेल. नेमका यावेळी बाथरूम मधील रिपेयर केलेला नळ परत गळायला लागला असतो. त्या प्लंबरच्या नावाने माझा उद्धार होतो. इस्त्रीवाल्याने दोन कपडे गहाळ केले असतात त्यासाठी मला फैलावर घेतले जाते. बिल्डिंग मध्ये कोणीतरी कुणाशी तरी भांडते त्याबद्दल मात्र मी निश्चिंत असतो कारण त्यात माझी नक्कीच काही चूक नसते. आम्हाला मुलगी एकच. ती लग्न होऊन गेल्यावर सासुरवास करायला सून नसेल या चिंतेने ती आपल्या लेकीलाच जमेल तितका सासुरवास करून आपली हौस पुरवून घेते.

भांडण करताना ही जे काही करते त्याला ’करवादणे’ हाच शब्द योग्य होईल. त्या अर्थाने ही करवादिनी आहे. एखाद्याच्या जिभेवर सरस्वती नाचते तशी हिच्या जिभेवर कालीमाता नाचते. जिंकलेल्या भांडणाची मुंडकी गळयात घालून शंकराने तांडवनृत्य करावे तशी इथे पार्वती नर्तन करते. विषयाचे बंधन नाही आणि कुठलीही पूर्व तयारी नसताना चपखल शब्दरचनेत हिचा हात कोणी धरू शकणार नाही त्या अर्थाने तिने भांडण वाङ्मयाला महत्त्वपूर्ण शब्दांचे योगदान दिले आहे. टोकदार शब्द हे अस्त्र बनून वर्मी कसे बसेल याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी शिकवणी लावावी अशी तिची योग्यता आहे.

जगातील आद्य भांडणाची नोंद इव्हच्या नावावर आहे म्हणे. त्यात ती ॲडॅमवर ’सफरचंद तितकेसे गॊड नाही’ म्हणून डाफरली होती असे इतिहास सांगतो. फक्त त्याकाळी पैसाच नसल्याने हे भांडण ’सफरचंद महाग पडले’ म्हणून झालेले नाही असे प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री.यशवंतराव बळवंतराव दडपे पाटील रायरीकर यांनी सांगितले आहे. ह्या ओरिजिनल इवेचा वारसा अजूनही मिळून सर्वजणी चालवत आहेत.

ह्या भांडणाचा ओव्हरडोस झाला म्हणून कधी स्वत:च अगदी विंध्य पर्वत नव्हे तरी कमीत कमी माथेरानच्या डोंगरावर जाऊन तप करायचा विचार येतो. पण दिव्यदृष्टीचे चष्मे एवढ्या वर्षात वाटून संपले असतील तर तपाचा काय फायदा आणि

परत मला गुडघ्याचा आर्थ्रायटिस पण आहे. दोन पायावर उभे राहायची मारामार तर एका पायावर कसले तप होणार?

मग मी सेमी मार्ग म्हणून घराबाहेर पडतो. रस्त्यावर लोक आपापल्या विवंचनांत चालले असतात. त्यात मला दोन जणांच्या भांडणाचा आवाज ऐकू येतो. बघतो तर भर रस्त्यात दोघांचे भांडण सुरू असते. दोघे भांडणमूर्ती मधे आणि चारीबाजूनी मजा पहायला लोक उभे. दोन्ही पार्टी तयारीच्या असल्या तरी कमालीच्या संयमी असाव्यात. एकमेकांवर ओरडण्या व्यतिरिक्त पुढे काही सरकत नाहीत. कोणीतरी 'मारो सालेको' म्हणून अग्नी प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करतो. आता पुढची गंमत बघायला मिळेल म्हणून सर्व प्रेक्षक ताटकळले असतात. पण भांडणवीरांना त्याचे काही नाही. शांतपणे ते भांडत राहातात. काहीच घडत नाही म्हणून काही लोक पांगायला लागतात तर काही अजूनही आशावादी असतात. थोडा वेळ जातो तरी हे भांडणवीर बाचाबाची पुढे गुद्दागुद्दीसाठी तयार नाहीत हे पाहून ते ही कंटाळून काढता पाय घेतात. आपल्या लाइव्ह परफॉर्मन्स चा टीआरपी घसरलेला पाहून दोघे भांडण संपवून आपापल्या मार्गानी निघून जातात. शेवटी 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' असे म्हटले आहे ते उगीच नाही. म्हटलेच ना की महापुरूष सांगतात ते उगीच नाही.

कंटाळून घरी येतो. तर ही वाटच पाहात असते. मग काल आणलेल्या फ्लॉवर वरून चिडचिड. त्यातून नेमक्या दोन हिरव्या अळया बाहेर पडतात.

एकदा मी कुठेतरी वाचले की अशा परिस्थितीत विनोदाचा शिडकावा थंडावा देऊ शकतो. म्हणून मी तो प्रयोग करायचे ठरवतो.

'अगं मागच्या वेळी चार अळया होत्या तर आज दोनच निघाल्या म्हणजे नक्कीच प्रगती आहे. आणि आजच्या अळया पण कशा हिरव्या आहेत. पांढऱ्यारंगावर contrast matching मुळे उठून दिसताहेत. बाकी काहीही म्हण आजकाल पूर्वीसारख्या अळया पण राहिल्या नाहीत. नाहीतर आपल्या लहानपणी कशा छान अळया निघायच्या नाहीत फ्लॉवरमध्ये! '

हिला येताजाता आपल्या लहानपणी काय नव्हते हे सांगायची सवय आहे. मुलगी लहान असताना साधा खोडरबर देतानाही 'आमच्या आईबाबांकडून आम्ही एवढे

रबर नाही कधी मागितले’ असे सांगत असे आणि तिला शाळेच्या बस मध्ये सोडताना लहानपणी शाळेत नदी ओलांडून जावे लागे याचे वर्णन करत असे. कधी मुलीने ’आता इथे नदी नाही तर ओलांडू काय?’ असे म्हटले तर ’आजकाल मुलं फारच उद्धट झालीत आम्हाला नव्हती हिंमत आपल्या आईबाबांना उलटून बोलायची’ यावर निरूपण होत असे. आता विनोदापायी तिच्याच सवयीचा उद्धार मी केला तर पुढे काय होणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नव्हती. बोललेला शब्द परत येत नाही. पूर्वी धनुष्यातून निघालेला तीर येत नसे तसा. आजकाल मोबाईलमधून पाठवलेला एसेमेस आणि सेंड केलेला इ-मेल परत येत नाही. ( बोललेला शब्द परत घ्यायची सोय आपल्याकडे आमदार खासदारांना मात्र आहे. एकमेकांच्या उरावर बसून उणीदुणी काढून परत ते शब्द रेकॉर्ड मधून काढून टाकता येतात, पण ते राजकारणी, आपल्या सारखे सर्वसामान्य थोडीच आहेत ते? )

या विनोदापायी ’चूल बंद’ सत्याग्रह झाला आणि हिचे मौनव्रत नि माझे उपोषण ही घडले. मौन व्रताने फायदाच झाला पण उपोषणाने तो धुवून निघाला. ज्या कोणी विनोदवीराने हा सल्ला दिला त्याला कोर्टातच खेचले पाहिजे.

मुलगी कॉलेजात त्यामुळे मी एकटाच तिच्या तावडीत सापडतो.’जीवन एक संघर्ष आहे’ हे पण कोणा महापुरूषाने म्हटलंय ते उगीच नाही, बोलून चालून महापुरूषच ते !

१०

## मी घेतलेली माझी मुलाखत

मुलाखतीसाठी मी मला मोबाईल वर फोन केला तर सतत एंगेज्ड. म्हटलं कार्यबाहुल्याने बिझि असणार.

नंतर लक्षात आले की मी माझाच मोबाईल नंबर फिरवत होतो,तो एंगेज्ड येणारच.

मग मी मला लँड लाईनवर फोन लावला.

एका कानावर मोबाईल आणि दुस~यावर साधा फोन घेऊन रीतसर मुलाखतीसाठी अपॉईंटमेंट घेतली !

मी: नमस्कार ! आजचे आपले खास पाहुणे आहेत प्रसिद्ध विनोदी लेखक अनंत मिराशी. मिराशींचे कित्येक विनोदी कथा संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.काही जण

voracious reader असतात तसे मिराशी हे voracious writer आहेत. नमस्कार मिराशी सर !

आरशातला मी.: नमस्कार !

मी:फार दिवसा पासून तुमची मुलाखत घ्यायची इच्छा होती. सुरू करूया?

आ.मी.: यस. व्हा स्टार्ट.

मी: सर्वप्रथम मला सांगा तुम्हाला लेखनाची प्रेरणा कुठून मिळते?

आ.मी:प्रेरणा? होय होय काय प्रश्न आहे सांगू? आमच्या कॉलेजात होती ती. प्रेरणा सामंत. इतर अनेकांप्रमाणे तिने माझा ही हार्ट ब्रेक केला होता. काय सांगू, चार्ली चॅपलिन पासून सर्व विनोदी लेखक कलाकारांपर्यंत सर्वांच्या विनोदामागेलपवलेले दु:ख आहे बरंका.

मी: ते एक ठीक आहे. पण सखाराम गटणे सारखा प्रश्न विचारतो म्हणून हसू नका. प्रतिभा साधनाची तुमची काही पद्धत,वेळ वगैरे?

आ.मी. : तुम्ही दुखती काय म्हणतात त्या रग वर हात ठेवलात पहा. प्रतिभा आणि साधना दोघी प्रेरणाच्या आधीच्या. आणखी काय सांगू. anyway those are closed chapters. पण लिखाणातला दर्द त्यांनी कायम ठेवायला मदत केलीय बघा. शेवटी हास्य रस निर्मिती मागे करूण रसाचा पाझर असतोच असे म्हणतात.

मी: पण तरी तुमचा विनोद हा नुसता निखळ विनोद वाटतो. तर तुमच्या मते सर्व श्रेष्ठ विनोद कोणता?

आ.मी.: मला वाटते की विनोद कांबळी was best. थोडा टेंपरामेंट मध्ये मार खाल्ला पण he was the best.

मी: अस्सं,तर ते असे आहे. सर तुम्हाला वाटते आजच्या काळात लेखकाला केवळ लिखाणावर गुजराण करता येऊ शकेल काय?

आ.मी.: अहो अगदी नक्की. हल्ली रद्दीचे भाव खूपच वाढले आहेत. त्यामुळे हस्तलिखिते,अप्रकाशित पुस्तके वगैरेना चांगलाच भाव मिळतो. जेव्हढे जास्त लिहू तेव्हढी जास्त मिळकत हा साधा हिशेब आहे हा. परत इकड तिकडची बक्षिसे,थोडीफार पुस्तकांची विक्री वगैरे आहेच.

मी: मग सर वाङ:मय चौर्यावर तुमचे काय मत आहे?

आ.मी.: काय आहे की असं म्हणतात की जगात ओरिजिनल अशा फारच थोड्या गोष्टी आहेत.मी एक सायन्सचा विद्यार्थी आहे. १२वी त आम्ही फिजिक्स शिकलोना त्यात काय होतं की one form of energy gets converted to another. त्यामुळे दुसरे कुणी लिहिलेले मी मला वाटेल अशा form मध्ये लिहिण्यात कसली आलीय चोरी न बिरी. आणि शेवटी नावात पण काय आहे?

मी: पण मग तुमचे साहित्य किती वर्षे टिकेल असे तुम्हाला वाटते?

आ.मी.: अनंत काळ. शेवटी paper is recyclable.एका पेपरातून दुसरा पेपर बनवू शकतो आपण.त्यामुळे ज्या पेपरावर हे सर्व छापले आणि लिहिले जाते त्या कागदाला तरी अंत नाही. हां, आता त्यावरचा मजकूर गेला तर नवीन कोणी लिहून काढेल.

मी: तुमचे आवडते लेखक कोणते ते सांगाल का?

आ.मी.: मला की नाही देशी पेक्षा विलायतीच आवडतात.

मी: मला वाटतं तुमचा काही तरी गैरसमज होतोय.

आ.मी.: नाही नाही मी लेखकांबद्दलच बोलतोय. मला विदेशी लेखकच जास्त भावतात. माझे आवडते लेखक म्हणजे नामीबिया तील कवॊ कार्ल्टन, आफ्रिकेतील चाड देशातील लघुनिबंधकार कारवां, हे त्याचे टोपणनाव आहे, आणि चीन मधल्या एक लेखिका आहेत टूंग वॉंग टूं. तिकडील साहित्य जास्त पारदर्शी आणि जीवनाभिमुख असते असे माझे स्पष्ट मत आहे.त्यात नवीन कल्पना पण खूप असतात.

मी: बरं तुमचे आवडते अॅक्टर?

आ.मी.: हां हे मात्र देशीच. महाराष्ट्रातील म्हणायचे तर ठाकरे आहेत, आठवले, राणे, देशमुख आहेत,भुजबळ आहेत

मी: मला वाटतं तुमचा काही तरी गैरसमज होतोय.

आ.मी.: नाही नाही तुम्हाला काय वाटतंय मी देशी का विलायती घेऊन बोलतोय काय? मी अॅक्टर बद्दलच बोलतोय. कसं आहे वर्षानुवर्षं लोककल्याणाचे बेअरिंग घेऊन ते टिकवून ठेवणे हे कसलेल्या अॅक्टरचेच काम नाही का. तर महाराष्ट्रा बाहेर मुलायम आहेत, ममता, मायावती, जयललिता. खूप सारे आहेत.

मी: म्हणजे राजकारण आणि राजकारणी हे तुमचा आवडते टारगेट दिसतात.

आ.मी.: मला नाही वाटत तसे. पण टारगट पणा हा राजकारण्यांचा गुणच आहेना. त्यांना वेगळे टारगेट करावे लागत नाही.

मी: तुमच्या इतर छंदांबद्दल सांगाल काय?

आ.मी.:(लाजून) हा फारच खाजगी प्रश्न झाला नाही का? नाही सांगू शकणार मी तुम्हाला.

मी: तुमच्या मते लेखकाला वाचनाची गरज किती आहे?

आ.मी.: खूपच. त्याशिवाय त्याला नवनवीन कल्पना सुचायच्या कशा? कल्पना घेऊन त्यांचा विलास करणे हेच तर लेखकाचे काम आहे ना. लेखकाचा व्यासंग दांडगा हवा. विशेषत: परकीय भाषा फारच उपयोगी कारण तिकडचे कोणी आपल्याशी भांडायला येत नाही त्यांची कल्पना वापरली म्हणून. बघा हां मी चॊरली म्हणत नाही आहे.एकदा वाचन वाढले ना की विषयांना तोटा नाही.

मी: नवीन लेखकांना तुम्ही काय संदेश द्याल?

आ.मी.: काय आहे की ह्या लाईनीत मेहनत खूप आहे, म्हणून तर मी याला लेखनकामाठी म्हणतो. त्यासाठी भरपूर वाचन पाहिजे. भारतीय आणि परकीय सर्व भाषांत भरपूर वाचा येथेच तुम्हाला नवनवीन आयडिया मिळतील. वेगवेगळया भाषांच्या वाचनाने भाषाभिसरण होते. आणि परकीय भाषा आमच्या लाईनीसाठी एक safer option आहे.

मी: तुमच्या लेखनावर कोणाचा प्रभाव आहे असं तुम्हाला वाटतं?

आ मी.: हे मी कसं सांगू शकेन? कोणा एकाचाच असा नाही. थोडं थॊडं मी सगळी कडून उचलतॊ

( इथे सर जीभ चावतात ) म्हणजे मला म्हणायचंय की सर्वांचाच प्रभाव आपल्यावर पडत असतो. तरी पण विशेष सांगायचं तर वेस्ट इंडीज जवळ काही छोटी बेटे आहेत तिकडचा एक लेखक आहे, क्लाईव्ह कालिचरण म्हणून त्यानी मला खूपच

प्रभावित केले आहे. त्यांनी अदिवासी संस्कृती वर उपरोध पूर्ण लिखाण तिकडच्या वांगटू भाषेत केले आहे.

मी: म्हणजे सर तुम्ही ख~या अर्थाने ग्लोबल आहात. आता सर्वात शेवटी मला राहवत नाही म्हणून हा प्रश्न. स्वत:च स्वत:ची मुलाखत घेणे तुम्हाला काही odd नाही वाटत का?

आ.मी.: नाही तसं नाही आहे. आपल्याकडे एका वृत्तपत्रात मुख्यसंपादकांची मुलाखत कार्यकारी संपादक घेतात. चांगली प्रदीर्घ असते आणि अगदी न चुकता दरवर्षी येते ती. हे पण स्वत:च स्वत:ची मुलाखत घेणे नाही का? तसेच माझे आहे हे. का मी माझीच मुलाखत घेऊ नये? शेवटी I also need publicity.

११

# मी एक भाषासेविका

अभिव्यक्ती स्वातंत्र्याकरता मार खाणाऱ्यात सर्वात लहान व्यक्ती मीच असले पाहिजे.लहान पणापासून लिहायची मला फार हौस.हातात पेन्सिल आली नि मी लिहितच सुटले. मग जिथे जागा मिळेल तिथे. आमच्या नव्याने रंग दिलेल्या भिंतींवर त्याचा अविष्कार दिसल्यावर आईचा संयम सुटला. तेव्हाचे खाल्लेले धपाटे आज ही लक्षात आहेत. त्या जुलूमाला न जुमानता मी भिंतींवरचे लिखाण चालू ठेवल्याचे आठवते. आपल्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यासाठी असे क्वचितच कोणी लढले असेल.

पुढे शाळेत जाऊ लागल्यावरतर काही विचारू नका. माझ्या लिहिण्य़ाला कसलेच बंधन मानवले नाही.उत्तर चूक की बरोबर, ऱ्हस्व दीर्घ यासारख्या किरकॊळ गोष्टींकडे लक्ष न देता मी लिहित राहिले.आणी,पाणि,मि हे शब्द बाईंनी कितीही वेळा सुधारले पण ते तसेच लिहायचा हेका मी सोडला नाही.एक गणिताचा अपवाद.त्यात आकड्यांशी संबंध. आमचे दूरचे काका आकडे लावून कंगाल झाले असे आई

म्हणायची.तेव्हापासून मी आकड्यांपासून दूर राहायचे ठरवले. तरी सुद्धा शाळेतला नंबर मी कधी सोडला नाही. कितवा वगैरेच्या डीटेल मध्ये जायची गरज नाही.लिहिताना मी कसलेच बंधन पाळत नसे. इंग्रजी किंवा हिंदीत एखादा शब्द अडल्याने मी पेपर कधीच सोडला नाही. भाषेचे मूळ उद्दिष्ट हे संवाद साधणे आहे याचा विसर न पाडता मराठी शब्द वापरून ती वाक्ये मी लिहायचे. त्यामुळे माझे मार्क कठोर पणे कापले गेले तरी बेहत्तर, मी आपला बाणा कधीच सोडला नाही.आजच्या हिंग्लीश,मिंग्लीश भाषेचा वापर मी खूप पूर्वीपासून करत आले आहे फक्त त्याचे श्रेय मला मिळेलसे दिसत नाही. असो भाषेचा हा लढा मी निरपेक्ष भावनेने तेव्हापासून लढते आहे.

लढाऊ वृत्ती पण माझ्यात तेव्हापासून आहे. विशेषत: तोंडाचा पट्टा चालवणे ही माझी स्पेश्यालिटी.त्यामुळे कॉमन नळावर पाणी भरायला आई मलाच पाठवत असे. तिथल्या इतर बायकांकडून तेव्हा मी खूप सारे नवीन शब्द शिकून घेतले आहेत. किंबहुना आणीबाणीच्यावेळी शाळेत शिकलेल्या भाषेपेक्षा तेच शब्द कामाला येतात हा माझा अनुभव आहे. जमेल तेव्हढी मायबोलीची सेवा करण्याचाच माझा प्रयत्न असतो. मग ती लिहिलेली असो की बोललेली. लग्नानंतर तर भाषेचे प्रयोग करण्यास एक शास्त्रीय भाषेत सांगायचे तर गिनी पिग हाती लागला आहे. तसा माझा नवरा चांगला शिकलेला. चक्क मराठीचा प्रोफेसर. पण घरात मात्र त्याची मात्रा मी चालू देत

नाही.घरातल्या भाषेत माझाच फायनल वर्ड चालतो. माझा नवरा मितभाषी असल्याने हे आणखीच सोपे झाले आहे. तो आधी तसा नव्हता म्हणे. लग्नानंतर माणसं बदलतात म्हणतात ते खोटं नाही. मी मात्र पहिल्यापासून आहे तशीच आहे.माझ्यामागे ढालगज वगैरे विशेषणं वापरलेली मी ऐकली आहेत. तुम्हीच सांगा कोणा मागून वाईटसाईट बोलणं लोकांना शोभतं का?

भाषेची सेवा करायला लिहिण्यासारखी दुसरी गॉष्ट नाही.प्रॉब्लेम एवढाच व्हायचा की मला सुचलेल्या विषयावर आधीच काहीतरी लिहीले असायचे.आता हेच बघा ना. सकाळी सकाळी दूध घ्यायला उठले.समोर भय्या. म्हटलं भय्याला दिली ओसरी, आणि त्याच दिवशीच्या पेपरात ’भय्या हात पाय पसरीची’ ॲड. सांगा आता काय लिहू? रेल्वे झालं पोष्ट झालं,पाळीव प्राणी झाले. चक्क पुलंनी लिहून ठेवलं आहे.माझ्यासाठी काय विषय सोडला नाही. शेवटी सुनीताबाई आणि यशोदाबाई मदतीला आल्या. काहीनाही तर आपल्या हक्काच्या नवऱ्यावरच लिहावे.नशीबाने नवरा बेंगरूळ निघाल्याने मॊठीच सोय झाली माझी. आता ’आमचे हे : एक ध्यान’ या रेडिमेड नावाने हे लिहावे की दुसरं कुठलं नाव द्यावे याचा विचार चालू आहे. शेवटी पुस्तक प्रकाशित होणे महत्त्वाचे.म्हणजे पुढेमागे साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहाता येईल. तेवढीच आपली साहित्य सेवा आणि काय?

# १२

## काही कौटुंबिक क्षणचित्रे : काही मूर्त काही अमूर्त

'हे काही फार skill चे काम नाही, for a science teacher like me, I just have to get composition of components right.' कांदेपोहे खाता खाता मी हिला म्हणालो.

'कशाबद्दल बोलताय?'

'पोह्यांबद्दल. मला काय वाटतं माहिती आहे? जेवण बनवणे ही रासायनिक प्रक्रिया आहे एक. म्हणजे बघ दहा मिलीलीटर तेल, त्याला उष्णता दिली आणि त्यात मोहरी टाकली की ती तडतडते, ही एक रासायनिक क्रिया आहे, त्यात कढई गरम होते कारण ती ज्या धातूने बनते त्यातून उष्णतेचे वहन होते. पोहे बनतात त्रेव्हा ही irreversible रासायनिक प्रक्रिया होते. म्हणजे बघ पोह्यांत घातलेले तिखट आणि मीठ आपण परत मिळवू शकत नाही. मला वाटतं for a science teacher कुकींग एकदम सोपी गोष्ट आहे एखाद्या प्रयोगासारखी.'

माझे एवढे लांबलचक भाषण हिने ऐकून घेतले याचे मला आश्चर्य वाटले. ही कित्येकदा दिवसभर स्वयंपाकघरात कामाला का जुंपून घेते कोणास ठाऊक. स्वयंपाक हा एखाद्या प्रयोगासारखा लगेच संपवता येईल असे मला नेहमीच वाटायचे.

'बरं, बरं. एक करा, अगदी पूर्ण जेवण नाही पण आज एकदा एकवेळचा नाश्ता करून दाखवा, नाहीतर नुसता उपमा करा. तुमची रासायनिक समीकरणे वापरा नीट.'

'सोपा आहे तो. रव्यात तिखटमीठ टाकलं की उपमा तयार. Don't ललकार me ! I accept the challenge.' मी मोठ्या उत्साहात म्हणालो.

निर्मितीक्षमता हा माझा मोठा गुणच आहे. अगदी लहानपणापासूनच. आई मला वेगवेगळ्या समस्यांचे निर्माण करणारे यंत्र म्हणत असे. मग त्यात कधी एखादा हातपाय तोडून घेणे असेल वा ऎन परिक्षेच्यावेळी माझे पुस्तक किंवा वही हरवणे असेल. हिचे मत पण काही फार वेगळे नाही. फक्त आई मला धांदरटच आहे म्हणायची तसे आपल्यात नवऱ्याला म्हणण्याची पद्धत नाही. नवऱ्याला बावळट म्हटले तर मात्र चालत असावे. तर ते असो. मी शेवटी तो उपमा बनवायला घेतलाच.

रवा हा एक पाणी शोषून घेणारा म्हणजे hygroscopic पदार्थ आहे म्हणून मी पाणी जास्त घ्यायचे ठरवले. भांड्यात तेल टाकून त्यावर मोहरी तडतडवली. रवा भाजला जावा म्हणून नीट कढईत ओतला. थोडा फिरवल्यावर म्हटले जरा वेळ वाचवायचेही प्रात्यक्षिक देऊन टाकावे म्हणून कांदा चिरायला घेतला.

'कसला करपट वास येतोय हो?' म्हणत ही स्वयंपाकघरात शिरली तोवर रवा काळया पाण्याची शिक्षा झाल्यासारखा दिसत होता. मी हार मानणार नव्हतोच.

'पाहिलंस, या प्रयोगातून एवढे सिद्ध झाले की रवा भाजायला जाड बुडाचे भांडे लागते.' मी ओशाळवाणे पण लपवत बोललो आणि कढई परत चढवली. यावेळी मात्र मी काही चूक केली नाही. रवा कसा छान खरपूस भाजला गेला. त्यात मग फोडणी झाली, तिखटमीठाची iirreversible रासायनिक प्रक्रिया झाली.

मग मी एका मोठ्या भांड्यात पाणी घेतले. ते जरा गरम होते तोच त्यात हा रवा ओतला. झाला की उपमा. हाय काय नि नाय काय मी मनाशी म्हणालो.

मग पाणी आटू लागले, Hygroscopic रवा पाणी शोषू लागला. Scientific basis समजवल्यास स्वयंपाक करणे सोपे. मी मनाशीच परत बोललो आणि उपम्याच्या भांड्यात चमचा घातला तर त्यात बोरापासून लिंबाच्या आकाराचे मोठे रव्याचे गोळे ! हे खाणे शक्य होईल? मीच मला प्रश्न विचारला. हे असे होणार असा हिला अंदाज असावा कारण ही गालातल्या गालात हसत होती. पण तशी ती शहाणी आहे, केव्हा टोचू नये हे तिला नीट कळते.

आता पाक- शास्त्र असले तरी स्वयंपाक शास्त्रीय पद्धतीने करण्याचे मात्र मी बोलत नाही.

*****

वजनदार व्हायचे माझे स्वप्न होते. म्हणजे समाजात वजनदार व्हावेसे मला वाटत असे. ते काही शक्य झाले नाही. माझ्या बीएस्सी नि एमेस्सीच्या जोरावर मी शिक्षक झालो खरा पण शास्त्र विषयाच्या माझ्यासारख्या शिक्षकाचे पडून पडून काय वजन पडणार? तेव्हा सामाजिक नही तर शारिरीक ही सही म्हणून माझे वजन वाढतच गेले दरवाजाचे बिजागरे कुरकुरावेत तसे माझे गुढगे कुरकुरू लागले आणि कोलेस्टेरॉलही वाढायला लागले . ( काही जणांना मी याचा उच्चार चोलेस्टेरॉल म्हणून करताना मी ऐकले आहे, शास्त्रीय शिक्षणाचा अभाव आणि काय? ) मी मग वजनाकडे गंभीरतेने पाहायला लागलो. माझ्या स्वभावातच ही गोष्ट आहे. समस्येचे मूळ शोधून काढणे. परत एखाद्या बाबीसाठी स्वत:च स्वत:ला जबाबदार धरण्याची पद्धत आपल्याकडे नाही. त्यामुळे माझे वजन वाढण्यासाठी जबाबदार कोण? मी याचा दोष कोणाला द्यावा याचा विचार करू लागलो.

’तुझ्यामुळे. तुझ्यामुळेच माझे वजन हे असे वाढतंय,’ मी हिला म्हणालो. ’भाजीत चांगलं दोन पळया तेल टाकतेस म्हणून वजन वाढत चाललेय माझे.’

'हो ना. मग आजपासून बिनतेलाची उकडलेली भाजी खा.'

मी हिला म्हणालो खरे पण खरी गोष्ट मला ( नि हिला ही ) ठाऊक होती. फार वर्षांपूर्वी मी आजपेक्षाही तापट होतो. मला आठवड्यात चारदा तरी भजी नाहीतर वडा नाही तर काही तरी अरबट चरबट लागे. लागे म्हणजे अजूनही लागतेच. जेवल्यावर काही गोड नसेल तर माझा तिळपापड होतो. पापडावरून आठवले. पापड पण मी कधी भाजून खात नाही. तो तळूनच माझ्या घशाखाली उतरतो. काही वर्षांपूर्वी हिने माझ्या खाण्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केलाही होता. पण माझ्या स्वभावाला अनुसरून मी ते ताट भिरकावून देऊ लागलो. माझ्या आदळआपटीला कंटाळून ही माझ्या जिभेचे चोचले पुरवीत राहिली. काहीही झाले तरी वजन वाढायला हे कारण आहे हे खरे. पण मी तरी हिला दोष देऊन पाहिला. ही काही अशी विकेट देणार?

'आणि आता तळण बंद, स्वीट डिश बंद, तुम्हीच सांगताय हे लक्षात ठेवा. ' तिला मला ऐकवायची मी आयतीच संधी दिली.

तरी पण म्हटले हे काही खरे नाही. काही करून वजन उतरवायचेच हा दृढनिश्चय मी केला आणि आयुष्यात प्रथमच जिमची पायरी चढलो. घरी हिने माझी अरबटचरबटाची कोंडी केलीच होती त्यात ह्या जिमवाल्यांनी डाएट च्या नावाखाली आणि काही नवीन उकडून कडधान्ये वगैरे सुरू केली. मी फारच सिरीयस होतो. रोज मी सकाळी नियमित जात असे. पाऊण तासाच्या व्यायामानंतर श्रमपरिहार म्हणून जिमबाहेरीलच वडापाववाल्याकडे दोन वडापाव खाऊन घरी जात असे. घरी तळण स्ट्रीक्टली बंद होते. त्यामुळे फक्त दोन वडापावने वजन वाढण्याचे काही काम नव्हते. कधी मधी चवीत बदल म्हणून बर्गर नाहीतर पिझ्झा पण होई पण वजन काय या गोष्टींनी वाढते थोडीच. उलट पिझ्झावरील भाज्यांनी आणि बर्गर मधल्या कोबीच्या पानांनी ते तर एकदम हेल्दी फूड असतात असे असे माझ्याच काही विद्यार्थ्यांनीच मला

सांगितले होते. महिना उलटला आणि माझ्या वजनाने कमी होण्याऐवजी चांगलेच बाळसे धरले. जिमवाले चक्रावले. ही मात्र नाही.

'तुम्ही काही म्हणा, तुम्ही काही त्या तळणाशिवाय राहात नाही. नक्कीच काहीतरी कुठेतरी खात असणार,' तिचा अंदाज म्हणजे ती मला किती नीट ओळखते याचा पुरावा होता. आता मी वजनाची चिंता करणे सोडले आहे. जिमवाले मी त्यांची जिम सोडून गेलो म्हणून खूश आहेत. गुढगे तसेच कुरकुरतात. खाण्यातले तेल कमी झालेय पण आता ते ही गुढग्यांना चोळून देतेय. तसा हिचा हात चांगला आहे हे मात्र खरे...

*****

'तुम्हाला हौस म्हणून कशाची नाही.'

हे वाक्य मी बऱ्यापैकी नियमितपणे हिच्याकडून ऐकत आलो आहे. नवऱ्यांचे हौशी आणि व्यावसायिक असे प्रकार नसतात हे मला ठाऊक आहे पण मी हौशी नवरा बनण्याचा मधून मधून प्रयत्न करत असलो तरी हिच्या हौशेच्या पातळीपर्यंत काही पोहोचू शकत नाही. त्यामुळे माझे मलाच तोंडघशी पडल्यासारखे होते.

आता यावेळची गोष्ट पहा. आमच्या तीन खोल्यांच्या ब्लॉकच्या भिंतींचा रंग कधीपासूनच उडालेला. ठिकठिकाणी पोपडे पडलेले. भिंती त्यामुळे चित्र विचित्र दिसत. यातही मी माझा एक विरंगुळा शोधला होता. पडल्या पडल्या त्या नक्षीतून मला विविध आकृत्या दिसत. ( चाणाक्ष वाचकांना माझ्या बैठ्या किंव्या पडत्या प्रकृतीची यातून कल्पना यावी. अर्थात हे हल्लीचे, पहिलीत असताना मी उत्तम अॅथलीट होतो, तेव्हाच्या चमचागोटीत मी फर्स्ट आलेला मला आठवतो अजूनही. ) त्यांत मला कधी इंदिरा गांधींचे नाक दिसे, कधी अमिताभचे हातवारे दिसत तर कधी राजीव गांधींची

टोपी दिसे. त्यात कधीतर मला निसर्ग चित्रे ही दिसत म्हणजे समुद्राच्या लाटा किंवा डोंगर वगैरे. कित्येकदा तर मला त्या चित्रांना बाजूनी फ्रेम रंगवावीसे वाटे. म्हणजे नवीन प्रकारचे इंटिरियर डेकोरेशनही होईलसे वाटायचे. अर्थात माझी ही कल्पना मी कधी उघड बोलून दाखवली नव्हती हिला, कारण साधेच, एकतर माझी कल्पना म्हणजे हिला ती आवडणे अशक्य, आणि दुसरे त्याच्यावरून हिने हल्लाबोल केला तर कठीण. म्हणून ही माझी कल्पना मी मनातच ठेवली होती. माझी निर्मिती क्षमता अशी मी दडपून ठेवली होती खरी. ( लहानपणापासूनच मी निर्मितीक्षम होतो. आई मी नवनवीन प्रॉब्लेम निर्माण करतो म्हणायची. आता तो वसा हिने मनोभावे घेतलाय. )तर गोष्ट त्या रंग उडालेल्या भिंतींची होती.

गेल्या काही महिन्यांपासून हिने मागे लकडा लावलाय, ’यावर्षी रंग काढूया घराला, फारच जुना झालाय.’

मी नेहमी प्रमाणे म्हणालो, ’बघू.’

हिला डायरेक्ट ’नाही’ म्हणण्याचे कधीपासून ठरवतो पण ते काही जमत नाही.

त्या भिंतींवरील कार्टूनांचा विरह, तोही पैसे मोजून, परत रंगकाम म्हणजे अख्ख्या घराची आठवडाभर दशा. मला काही हा विचार पटेना. अर्थात मी काही हिला ते सांगू शकत नव्हतो हे मात्र खरे.

’बघू, हा पाऊस तर संपू देत.’ मी हिला म्हणालो.

’ऑक्टोंबरात कसला आलाय पाऊस?’

'मागच्या वर्षी चांगला नोव्हेंबरात पडला होता. हवामान खात्याने सांगितलंय या वर्षी पावसाळा लांबणार आहे, कालच्याच पेपरात होतं, वाचलंस की नाही?' मी बिनधास्त ठोकून दिले, कारण ही पेपरबिपर वाचायच्या फंदात पडत नाही, हिला पेपराचे कौतुक फक्त रद्दीच्या पैंशामुळेच.

'आठवतंय की नाही मला मागच्या नोव्हेंबरात खूप सर्दी झाली होती ते, तू ते बचकाभर व्हिक्स लावलेस जाहिरातीतल्या सारखे नि मला जळजळलं होते.'

'काहीतरीच, मी मोठ्या प्रेमानेच लावले. तुम्हीच उगाच किंचाळला होतात तेव्हा.'

'काहीतरीच? अजून जळजळतंय.'

मला वाटलं तो रंगाचा विषय मागे पडेल. पण हिला अर्जुनाला दिसणाऱ्या माशाच्या डोळ्यासारखा फक्त तो घराचा रंग दिसत होता.

'उगीच विषय बदलू नका. यावर्षी कलर काढायचाच.'

मी मग काहीच बोललो नाही. अशा वेळी मी काही बोललो तरी हिचा पारा चढतोच. नाही बोललो तरी पण तेच. मी गप्प बसून तोंडाची वाफ वाया घालवत नाही आणि ऊर्जेची बचत करतो. मी नेहमी माझ्या मुलांना शिकवत आलोय, Energy saved is energy produced. अर्थात यावर हिने तिच्या तोंडाची वाफ दवडून मी वाचवलेल्या वाफेच्या दुप्पट वाफ दवडलीच. या स्त्रीहट्टाचे पुढे काय होणार हे मी सांगायची मला नाही वाटत काही गरज आहे. लवकरच आम्ही रंगीबेरंगी आकाशकंदिलात राहू लागलो. माझी ती भिंतीवरची अमूर्त चित्रे लोप पावलॉ याचे मात्र मला अतीव दु:ख झाले.

१३

## **स्वप्नांच्या अलि- पलिकडले**

सुविचारांचा माझ्या मनावर खूपच प्रभाव असे, म्हणजे अजून ही आहे. ’बाल’ मन होते तेव्हा तर खूपच, वयाने मोठा झालो पण आतील मनाची वाढ खुंटली की काय? ते बालच राहिले असावे. कारण अजूनही सुविचारांची आवड काही जात नाही. सदा सत्य बोला, लवकर निजे लवकर उठे नि गेलेला शब्द नि धनुष्यातून सुटलेला बाण परत येत नाही वगैरे वगैरे. सुविचारांवर श्रद्धा ठेऊन मोठ्या वयात बाल मनाने जगणे ही एक कसरत आहे खरी.

असाच एक सुविचार आहे...

स्वप्ने पहायला शिका !

ठीक आहे. स्वप्ने पडतात झोपेत म्हणून जास्तच झोपा, हा त्याला जोड सुविचार हा माझा विचार ! असो. तर झोप, झोप आणि स्वप्ने, स्वप्ने...

१.

श्री. भानुकांत लक्ष्मण सरदेशमुख. हे नाव ऐकून जशी व्यक्ती डोळ्यासमोर येते तसेच भानूचे व्यक्तिमत्त्व आहे. या नावाची एखादी व्यक्तीच असू शकते, इसम नाही. भानू माझा मित्र. त्याची पत्नी भानुमतीताई. दोघांचा सुखी संसार. फक्त एकच काळजी. त्यांचा आधीचा हुशार मुलगा एका झटक्यात दहावी नंतर पास व्हायला तयार नाही. मजल दरमजल करीत आता कोठे बारवीत पोचलाय खरा पण यावरून दोघे विवंचनेत. भानू आपली सेंट्रल गव्हर्नमेंटची नोकरी इमानेइतबारे सांभाळतोय...

असा हा भानूकांत. असून असून किती भन्नाट असू शकतो?

भन्नाट भानूला नोकरी लागली. म्हणजे आजवर तो नोकरी करत नव्हता असे नाही पण आता त्याला हवी तशी नोकरी मिळाली. आजवर ट्रेनचे धक्के खाऊन तो कंटाळला होता. तरी हल्ली गाडीच्या टपावर रेल्वेने सीट बेल्ट सकट बसायची सोय केली आहे. त्यात परत टपावरून ओपन एयर ला पन्नास टक्के कन्सेशन ! मनमोकळी हवा खात तो बुलेट ट्रेनने रोज दिल्ली-मुंबई अपडाऊन करतो. बुलेटच्या स्पीडने जाताना थोड्या डुलक्या देत फ्रेश होत तो ऑफिसात पोचतो. तरीपण वर चढायची दगदग होतेच. कधी पासून तो या चंद्रावरील नोकरीच्या मागे होता. शेवटी एकदाची मिळाली. आता दर आठवड्यात घरी जाऊन येऊन नि एकदा बस्तान बसले की कायमचे चंद्रावर शिफ्ट. चंद्रावर अजून तरी जागा स्वस्त आहेत. परत well plannedरस्ते त्यामुळे ट्रॅफीक कमी. एकूणच स्टॅण्डर्ड ऑफ लिव्हींग चांगले आहे. मंगळावरही चांगले जॉब्स आहेत पण मंगळावरून दर आठवड्यात जा ये करता येणार नाही. त्यापेक्षा हे बरे ! परत चंद्रावरच्या बोर्डाचे सिलॅबस ही सोपे आहे. पोरगा एकदाचा परिक्षेतून सुटला म्हणजे बरे. भानू आणि भानी स्वत:वर खूश ! आपले ग्रह खरेच उच्चीचेच आहेत. चंद्रावरून ते अधिकच उच्चीचे वाटताहेत....

स्वप्नांना पण सिक्वेल असतो की काय? Part 2 ?असणार. Fast forwardझाले. भन्नाट भानू आणि भानी चंद्रावर आता स्थिरावले आहेत. म्हणजे सोप्या भाषेत सेटल झालेत. त्यांचा मुलगाही शिकून मोठा झालाय चांगला. काय झालाय कोणास ठाऊक पण आहे कोणी मोठा कोणीतरी. चंद्रावर तरंगतोय. तिथे artificial झाडे च झाडे. त्यावर सूर्याच्या एनर्जीवर चालणारे मोठमोठाले बल्ब्स. सगळीकडे लख्ख उजेड. भानूपुत्र तरंगतोय, त्याच्याबरोबर ही कोण? धरतीवरची नाही वाटत. परग्रहावरची? एलियन मुलगी?प्यार जात,धर्म, देश वगैरे नही मानता हे ठीक पण अब धरती भी नही मानता ? आता काय? परग्रहावरील मुलीशी लग्न? भानू नि भानी मानतील? की पृथ्वीची इज्जत धोक्यात ? आणि पुढे यांना मुले झाली तर ती कशी असतील? पृथ्वीवरील मानवासारखी की परग्रहावरील एलियन सारखी? भानू आणि भानी कितीही भन्नाट असले तरी त्यांना काही सुधरत नाही. भानी एवढेच म्हणतेय, तरी मी सांगत होते, चंद्रावर शिफ्ट होऊया नको, पण माझे मेलीचे कोण ऐकतो इथे ?

२.

मी. प्रथमपुरूषी एकवचनी. माझे व्यक्तिमत्व व्यक्तिमत्व म्हणावेसे नाही. माझी अंगकाठी 'अंग हीच काठी' किंवा 'काठी सारखे अंग ज्याचे असा तो' असा बहुव्रीही समासात विग्रह होईल अशी आहे. माझी पत्नी माझ्याहून या अंगात भारी आहे. बाथरूम सिंगींग हा माझा शौक आहे. छंदच म्हणा ना. रोज मी माझ्या गळयाला अंघोळ करताना धार करून घेतो. आवाज असा घासून पुसून घेतला की आहेच दिवस भरची खर्डेघाशी...

माझी उंची काय नि तिची उंची काय? ती सह्याद्री एवढी तर मी पर्वतीची टेकडी. पण हम हार नहीं मानेंगे. आम्ही मग बागेत गेलोच. तिथे ट्युलिप गार्डन मध्ये लाल गुलाब फुललेले. मला कंठ न फुटता तरच नवल. मी मुक्त कंठाने गाऊ लागलो,

जिंदगी ना टूटे लडी

चल ओरपूया आपण कढी.

हिला माझ्या सारखे शीघ्र कवियत्रित्व जमत नाही. ती फक्त कढी ओरपण्याची अॅक्शन करते आहे. माझा काय आवाज लागलाय सांगू. समोर गुप्त्यांचा अवधूत बसलेला. बाजूला अजून कोणी मी त्यांना ओळखत नाही.

'तोडलंस, मित्रा. तोडलंस!' अवधूत म्हणाला.

'हा काय नवा उपद्व्याप? आता काय तोडून ठेवलेत? एक काम नीट करता येत नाही.' इति अर्धांगिनी. ( खरे तर पाउणांगी, आम्ही दोघे मिळून शंभर टक्के असलो तर आकारमानाच्या हिशेबाने ही पंच्याहत्तर टक्के भरते नि मी पंचवीस ) उंचीत नि जाडीत मी असा मार खाल्लेला म्हणून काय झाले, माझा आवाज काय लागला होता म्हणून सांगू !

ते दुसरे परीक्षक म्हणालेच,

’वा ! काय स्वर्गीय आवाज आहे तुमचा. तुम्ही प्रति लताच आहात. माझ्या दुसऱ्या फिल्ममध्ये गायला याल का?’

माझा आवाज थोडा बसला असला म्हणून काय झाले? थेट लता बरोबर तुलना? एका मेल व्हॉइसची? ते परीक्षक कोण? रामसे बिमसे तर नाहीत? मराठीत कोणी रामसे आहेत का? कोणीतरी आहे तिथे म्हणणारे? आणि दुसरा सिनेमा? पहिला काढला की अजून अनुदानाची वाट पाहात आहेत? आणि माझ्याशी डायरेक्ट दुसऱ्या सिनेमाबद्दल बोलताहेत?

३.

कॉलेजचे दिवस. आम्हा तिघांची गँग. तिघांनी मिळून किती क्लासेस बंक केले असतील? ओम. शोम आणि मी. समानधर्मी. चकाट्या पिटणे हाच आमचा समान धर्म म्हणजे उद्योग. त्यात एकदा ओम आणि शोम चे भांडण झाले. दोघे भांड भांड भांडले. त्यात मी दोघांना समजावले. भांडण संपले. शेवट सारा गोड...

स्थळ कॉलेज कट्टा. पात्रे मी, ओम आणि शोम. ओमू आणि शोमू तावातावाने भांडताहेत. मी आलटून पालटून दोघांकडे पाहतोय. दोघांची बाचाबाची सुरू. ध्वनिप्रदूषण सुरू आहे. आवाजाची पातळी वाढत आहे. मी डेसिबल्स मीटर घेऊन बाजूला मोजत उभा आहे. ऎंशी नव्वदाची पातळी ओलांडली जातेय. ऐकायला मी एकुलता एक. दोघे का एवढे भांडताहेत? भांडणाचा अॅजेंडा काय हे कळत नाही. असेल काही. ओमू चिडतो आणि ओरडून म्हणतो,

’शोमू, काही बोलू नकोस. जो ताटली मे खाता है, उसी मे भोक पाडता है.’

मला त्याही अवस्थेत वाटते, काय ही राष्ट्रभाषेची दशा?

सीन चेंज..

भांडण एकाएकी शांत. शोम जेवतोय. पोटावर हात फिरवत शोम उठला. ढेकर देत पुढे झाला. मग ताटली नळाखाली नीट धुतली. त्यानंतर ड्रीलचा घर्र घर्र जोराचा आवाज. आपल्या ताटलीला भोक पाडतोय शोम्या, तेही ड्रीलने..

तेवढ्यात तिसऱ्या मजल्यावरून ओम उडी मारतो. माझ्या काळजाचा ठोका चुकतो. ओम मात्र पिसासारखा तरंगत, मांजर जशी पायांवर लॅंड होते तसा पायांवर सेफली उतरतो. मग तो शोमच्या हातातली ताटली हिसकावून घेतो. त्या भोकातून जगाकडे पाहातो. ड्रीलमशिनचे पार्श्वसंगीत चालू ! त्यानंतर तो आरोळी ठोकतो,

'कुत्ते, कमीने, I will drink your blood '

मग शोम हवेत उंच उडी मारत तिसऱ्या मजल्यावर पोहोचयो. आणि मग तिकडून ओमला जीभ दाखवून चिडवतो. एकाएकी ओम म्हणतो,

’बाई, तो पहा ना शोम मला चिडवतोय ’

त्या पाठोपाठ आम्ही तिघे गातो,

’ये दोस्ती हम नही तोडेंगे…’.

४.

आपल्या संस्कृतीत लग्नाला महत्त्व फार. लोकशाहीमुळे आपल्या कडे शाही लोकांची कमी नाही. त्यामुळे शाही लोकांच्या शाही मुलांचीही नाही. मधूनमधून त्यांची शाही लग्ने होतात. त्यावर पेपरातून कौतुक आणि हेवा मिश्रीत जोरदार टीका होतात. हे सर्व पुढच्या अशा शाही लग्नापर्यंत. मध्ये सारे कसं शांत शांत. आपल्या सारख्या सर्व सामान्यांची लग्ने म्हणजे मात्र अपवाद. माझ्या लग्नातला गोंधळ मला आठवला. आमच्या लग्नात लग्न लावणाऱ्या भटजींचाच पत्ता नव्हता ! ते येणारी गाडी पंक्चर झाल्याने मुहूर्त टळता टळता वाचला ! लग्ने आणि सोहळे ! कालच एका लग्नाला गेलो होतो. त्यात जिलेबी, गुलाबजाम आणि श्रीखंड अशा तीन स्वीट डीश, हे कमी म्हणून वर परत आइस्क्रीम ! श्रीखंडात जायफळ असतं म्हणे ! झोप येणारच खाऊन...

स्थळ व्हाइट हाऊस. वर पाटी, 'व्हाइट हाऊस मंगल कार्यालय.' माणसांची गर्दी. सगळे सुटाबुटातले साहेब नि गाऊन मधल्या पांढऱ्या बायका. स्टेज वर आंतरपाट धरून एकाबाजूस मनमोहन सिंग आणि दुसऱ्या बाजूस नवाज शरीफ. बाजूला सोनिया गांधी नववारी साडीत उभ्या आहेत. आंतरपाटाच्या एका बाजूस हातात माळा घेऊन बराक ओबामा नि दुसऱ्या बाजूस मिशेल उभे आहेत. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष भटजी म्हणून पण ते सुटाबुटात पाटावर बसलेले. ( मला ते ओळखायला येतात पण फ्रेंच नि जर्मन नावे वाचता किंवा उच्चारता येत नाहीत. आपल्याकडे उच्चार सुधारायला संस्कृत पाठांतर करतात तसे तिथे फ्रेंच नि जर्मन भाषेचे आहे म्हणे ) तेव्हढ्यात एक आपल्याकडील पोलिस येतो. त्याच्या हातात कुत्र्याचे पट्टे आणि त्यांना बांधलेले दोन कुत्रे. पोलिस शिट्टी फुंकतो तसे सारे गप्प होतात. ते कुत्रे मग हारांचा वास घेतात. पोलिस त्या हारांवरून मेटल डिटेक्टर फिरवतात नि निघून जातात. पोलिस गेल्यावर एक अति धिप्पाड आणि काळाकभिन्न आफ्रिकन उभा राहातो. सारे माना वरकरून

त्याच्याकडे पाहातात. मनमोहन सिंग एका हातात आंतरपाट पकडून दुसऱ्या हाताने आपली पगडी सांभाळत त्याच्याकडे मान वर करून पाहतात. तो आफ्रिकन मग आफ्रिकी भाषेत पण आपल्या मंगलाष्टकांच्या चालीत मंगलाष्टकं मोठ्याने म्हणतो. वाजवा रे वाजवा होते. सगळे पांढरे पाहुणे आपल्या हातातील अक्षतांकडे पाहात उभे राहातात. तेवढ्यात एक धोतरवाला येऊन त्यांना सांगतो,

'Throw that rice on the नवरानवरी’s head'

सगळे अक्षता बराक आणि मिशेलच्या डोक्यावर टाकतात. मग अंतरपाट दूर होतो. मिशेल आणि बराक एकमेकांना हार घालतात. मग इंग्लंडच्या राणीच्या पाया पडतात. काळाला अनुसरून राणी आशीर्वाद देते, ’इष्टपुत्र,पुत्री सौभाग्यवती भव !’ मग पंगत बसते. मिशेल पॅस्ट्रीचा तुकड्याचा घास बराकना भरवते. मग लाजत लाजत नाव घेते,

धबधब्यात धबधबा नायगारा धबधबा

बराकरावांचा आहे साऱ्या जगात दबदबा.

सारे टाळ्या वाजवतात...

पहाटेची स्वप्ने खरी होतात म्हणे. मनी वसे ते स्वप्नी दिसे असे पण म्हणे ! आता ( नेहमीप्रमाणे ) उलटा अर्थ लावला तर स्वप्नी दिसे ते मनात आधी वसे की काय? मग त्याचा मलाच पत्तासुद्धा कसा नाही. आणि ही पहाटेची स्वप्ने खरेच खरी कशी होणार? भन्नाट भानू नि भानी, ती एलियन मुलगी कोठून येणार? मी खरेच गायला लागणार? शोम खरेच ड्रीलने ताटलीला भोक पाडणार? आणि अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर विचार करतो की काय मी? माझ्या मनी हे असले कसे काय वसे जे स्वप्नी दिसे? ( आणि ज्याचा मलासुद्धा पत्ता नसे? )

## १४

## ( माझ्या ) भविष्यावर बोलू काही....

रविवार दुपारची वेळ. मी आपला हात पसरून ह.भ.प. पंढरीनाथ हरी राजूरकर शास्त्रींसमोर बसलो होतो. राजूरकरशास्त्री कीर्तनकार तर आहेतच पण प्रसिद्ध ज्योतिषीही आहेत. एक डोळा कुंडलीतील घरांवर आणि दुसरा माझ्या हातावर बारकाईने रोखून शास्त्रीबुवा मांडी घालून बसले होते. बऱ्याच वेळानी शास्त्रीजी म्हणाले,

'हुं मेहनत तुम्ही फार करता पण हवे तसे यश नाही बरं.'

हे एकदम परफेक्ट. मेहनत मी माझ्या परीने करत होतो. आता ऑफिसात कधीच मी २०-२५ मिनीटांहून उशीरा पोहोचत नाही. आठवड्यातील काही दिवस तर मी पूर्ण वेळ कामही करतो. काही काही जण दुपारी जेवल्यावर चांगली अर्ध्यातासाची डुलकी घेतात आणि मी मात्र १५ मिनीटांतच कामाला लागतो. अकांऊंट च्या कामात पण मी काही गफलत करीत नाही, कधीमधी एक दोन शून्ये पुढे मागे झाली तर, तरी पण साहेब माझ्यावर डाफरतात. आमच्या सगळया स्टाफ मध्ये जास्तीत जास्त वेळा साहेब मलाच बोलवत असतात. कधीमधी म्हणजे काही वेळा त्यांच्या केबिनमधून त्यांचे फायरिंग न ऐकताच मी आलेलो आहे. एवढे सगळे आहे पण प्रमोशन च्या वेळी मात्र अष्टेकर पुढे.अष्टेकराला कामाची सवय अशी नाही, पहावे तेव्हा त्याचे टेबल खाली. साहेब त्याला विशेष फायरिंग पण देत नाहीत. साहेबांना मस्का लावायला तो अगदी वेळेवर ऑफिसात येतो आणि काम संपवीपर्यंत बसून राहातो. माझ्या सिन्सियरीटीची किंमत नाही ऑफिसमध्ये. शास्त्रीजी खरेच सांगत आहेत.

शास्त्रीजी मधे काहीतरी बोलले तेव्हा मी माझ्याच विचारांत गुंग होतो. तेवढ्यात त्यांचे पुढचे शब्द कानी आले,

'तुम्ही एक करायला जाता आणि काहीतरी भलताच अर्थ बाकीचे काढतात. लोकांचे गैरसमज होतात.'

मला शास्त्रीबुवांबद्द्ल आदर वाटायला लागला. आमचे घर म्हणजे गैरसमजांचा कारखानाच आहे. हिला मी काहीही सांगितले तरी वाकडेच दिसते. शेवटी मी थकून काही सांगणे सोडले तर त्यावर 'आहे का काळजी काही, बसले नुसते मुकस्तंभ' अशी शेरेबाजी ऐकावी लागते.

शास्त्रीबुवा बोलूनचालून कीर्तनकार. त्यांचे बोलणे रसाळ आणि वाणी मधुर. गुंग होऊन मी ऐकत राहिलो. त्यांची फी दिली आणि घरी आलो. विचार केला तर वाटले राजूरकर शास्त्र्यांनी भूतकाळ तर सांगितला पण भविष्याचे काय?

दुसऱ्या दिवशी परत त्यांच्या पुढे हात पसरला.

शास्त्रीजी म्हणाले, 'जसे भूत तसेच भविष्य. भविष्याची बीजे भूतकाळात असतात. तुमचा भूतकाळ अगदी उज्ज्वल आहे.'

आहे कसला, होता. मी मनात म्हणालो. १०त इंग्रजी आणि गणितात काठावर पास, बी.कॉम ला मोजून ३९ टक्के, पुढे खाजगी नोकरी काही दिवस आणि केवळ सुदैवाने आताची सरकारी नोकरी. त्यातल्या त्यात पे कमिशन नंतर मात्र थोडेफार वाढलेले पगार. आता यालाच उज्ज्वल भूतकाळ म्हणायचे तर भविष्यात आहे तरी काय?

'काय आहे तुमच्या कुंडलीत शनी आणि राहूची आहे युती. त्याला केतूचा बाहेरून पाठिंबा आहे.'

बापरे! इथे पण युती की आघाडीचे कोअॅलिशन- संमिश्र सरकार. काहीतरी करून हे सरकार पाडायलाच हवे असा विपक्षीय विचार मनात आला तोच शास्त्रीबुवा म्हणाले,

’रवि हा एकच यांचा प्रभाव कमी करू शकतो पण तुमच्यावर त्याची ही कृपादृष्टी नाही.’”

’बरोबरच आहे. आमचे साहेब आहेत रवी रांगणेकर, सदान कदा माझ्यावर कावलेलेच असतात,’ मी म्हणालो.’

’ते रवि नाही, रवि म्हणजे सूर्य देव प्रत्यक्ष. त्यांची आराधना करा. नमस्कार घाला रोज २१.’

माझ्या तुंदिलतनूनी दोन अधिक एक तीन नमस्कार झाले तरी खूप. २१ कसले घालतोय मी. मी मनातच.

’आणि ओम रवयेय नम: ओम मित्राय नम: असा जप १०८ वेळा करा.’

त्यातल्या त्यात हे जमण्यासारखे होते. पण रोज औरंगजेबासारखी जपमाळ ओढत मी ( टीव्ही समोर) बसला असेन हे चित्र काही माझ्या डोळ्यापुढे आणता येईना.

’आणि दर रविवारी उपास करा, एका वेळी रात्री जेवा.दुपारी फक्त दूध आणि केळी.’

अहिंसक शास्त्रीबुवांनी एकदम उपास बॉंबच टाकला. एक तर उपास म्हटले की मला दुप्पट भूक लागते. त्यात परत रविवारी उपास? रविवार म्हणजे सकाळी लोळत पडणे, रविवारची पुरवणी अगदी शुभमंगल सावधान च्या जाहिरातीं सकट वाचून काढणे, त्यानंतर चिकन,मटण नाहीतर मत्स्यवर्गातील काही घेऊन येणे. दुपारी त्यांचे बलिदान सार्थकी लागेल इतके चापून जेवणे आणि दोन तास ताणून देणे. या स्वर्गसुखाला सोडून उपास? डायरेक्ट दूध आणि केळी?

मधुर आणि रसाळ वाणीचे शास्त्रीबुवा मला एकदम जादूटोणा आणि वशीकरण वाले बंगाली बाबा असावेत असा भास होऊ लागला. नाहीतर रविवारचा उपास हा कुठल्या अघोरी उपायाहून कमी आहे का?

घरी आलो. बायकोने विचारले, 'काय म्हणाले गुरूजी?'

राजूरकरशास्त्रींवर हिचा अतीव विश्वास. त्यांनी अगदी निर्जळी उपास सांगितला तरी तो तिने मला करायला लावला असता.

'अगं शास्त्रीजी म्हणाले सोमवार,गुरूवार आणि संकष्टीचा उपास आपल्या दोघांपैकी कोणी तरी करावा.'

ही हे तिन्ही उपास आधीपासूनच करते हे मला माहीत होते. माझ्या सराईतपणे बोलण्याचे माझे मलाच कौतुक वाटले.

'अहो खरंच की काय? हे तर मी आधी पासूनच करतेय.' ही अगदी समाधानाने म्हणाली.

'अरे खरेच की.' मग थोड्यावेळाने मी म्हणालो, 'कसंय बरं मालू, मी आज हा जो काही आहे ना तो तू आणि तुझ्या उपासामुळेच बरं'

'चला तुमचे आपलं काहीतरीच ! ' ही म्हणाली आणि विश्वास बसणार नाही पण ती चक्क लाजली.

एवढ्या वर्षांनीपण ती लाजू शकते यावर माझा विश्वास एरव्ही बसला नसता.

राजूरकरांचे भविष्य आणि भूत काही असो हिच्या लाजण्यामुळे माझे वर्तमान मात्र एकदम उज्ज्वल आहे,

मनात म्हटलं शास्त्रीबुवांना दिलेली फी तरी अगदी वसूल झाली.

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहेत वाचक? कुठे आहे आपली भाषा जगाच्या नकाशावर? कुठे आहोत आपण?

आमची मायबोली जागतिक दर्जाची भाषा आहे! तिला तो मान जगभरातून मिळायला हवा. आणि बाहेरच्यांनी मान देण्यापुर्वी आपण तो द्यायला हवा. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य